
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा



वर्ष एकविसावे / अंक ५/ मे २०२०

## संपादकीय

### विल्यम जोन्स पूर्व भारतीय संस्कृतीचा अभ्यास

रॉबर्ट क्लाइव्ह (Robert Clive) आणि वॉरन हेस्टींग (Warren Hastings) यांच्या आधीही अठराव्या शतकामध्ये अनेक इंग्रज प्रवासी, धर्मप्रसारक आणि ईस्ट इंडिया कंपनीचे कर्मचारी भारतात येत होते. आपल्या ठरलेल्या कार्यक्षेत्रापलीकडे भारतीय समाजव्यवस्था, धर्मसंकल्पना, भाषा, ते अगदी वेष, व्यापार आणि उद्योगधंद्यांचे ते कसोशीने निरीक्षण करायचे. यातल्या अनेकांनी आपली निरीक्षणे ग्रंथबद्धही करून ठेवली आहेत. अर्थातच इंग्रज अधिकाऱ्यांना आपली धोरणे ठरवण्याकरता या सगळ्याचा फायदा होत असे.

इंग्रजांचा धर्म, भाषा आणि संस्कृती ही आपल्यापेक्षा संपूर्णतः भिन्न होती. आपल्यापेक्षा श्रेष्ठ संस्कृती किंवा भाषा जगात असू शकते यावर त्यांचा विश्वास नव्हता. भारतात आल्यावर मात्र भारतीय संस्कृतीची विविधता आणि विकास बघून ते थक्क व्हायचे. याचवेळी युरोपमध्ये विज्ञान क्रांती आणि औद्योगिक क्रांती होत होती. यंत्रयुगाला नुकतीच सुरुवात झाली होती. भारतातील कच्चा माल इंग्लंडमध्ये नेऊन, तयार माल भारतामध्ये विकण्याच्या व्यापारातून, कंपनी प्रमाणेच त्यांचे अधिकारी आणि व्यापारीही प्रचंड नफा कमवत होते. अर्थातच यामुळे परंपरागत तंत्रज्ञानावर आधारित भारतीय व्यवसाय मात्र देशोधडीला लागले.

इंग्रजांप्रमाणेच डॅनिश, डच आणि फ्रेंच व्यापारीही भारतात व्यापाराकरिता येत होते. अर्थातच १७५७ च्या प्लासीच्या लढाईमध्ये फ्रेंचांचा पराभव झाला, आणि इंग्रजांचा प्रभाव वाढायला लागला. याच वेळी मोंगल सत्तेकडून इंग्रजांना जमिनीचा सारा वसुली आणि दिवाणी न्यायाचे हक्कही मिळाले.

भारतीय प्रचलित धर्म आणि सामाजिक व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप न करता राज्यकारभार चालवण्याचे ब्रिटिशांचे धोरण होते. या पार्श्वभूमीवरच भारतीय समाजव्यवस्था काय आहे आणि तिची प्रचलित भाषा काय आहे, या दोघांचाही अभ्यास इंग्रज करायला लागले. निदान कंपनीच्या सुरुवातीच्या अधिकाऱ्यांचा तरी असा कटाक्ष होता की, कुठलीही पाश्चात्य व्यवस्था भारतीय राज्यकारभारात आणायची नाही.

राज्यकारभारामध्ये धोरणांच्या अंमलबजावणीकरिता भाषा सर्वात मोठी भूमिका बजावते. (पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

यातूनच इंग्रजांनी प्रांतीय भाषांचा अभ्यास सुरू केला. तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की, या सर्व भाषा संस्कृतोद्भव असून धर्मशास्त्रापासून राज्यव्यवहारापर्यंतचे सगळे शास्त्रीय ग्रंथ हे संस्कृतमध्येच आहेत. भाषेप्रमाणेच, भारतातील सर्व 'सामाजिक' आणि 'सांस्कृतिक' व्यवस्थांच्या रचनेमध्येही धर्म आणि तत्त्वज्ञानाची बैठक असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. खऱ्या अडचणीला इथेच सुरुवात झाली. भारतीय 'धर्म' संकल्पनेचे आकलन होताना त्यांची दमछाक होऊ लागली. अनेक देव आणि त्यांची मूर्तिपूजा; तरीही चराचरामध्ये एकच तत्त्व भरले आहे ही भारतीयांची संकल्पना यांची सांगड कशी घालायची यात इंग्रजांचा गोंधळ होऊ लागला.

पंथ (Religion) संकल्पनेमध्ये एक 'प्रेषित' असतो, एक 'पंथग्रंथ' असतो, आणि त्या पंथांच्या सभासदांना या दोघांच्या परिघातच सर्व व्यवहार करायला लागतात. जसे की, ख्रिस्ती धर्माचा प्रेषक 'येशूख्रिस्त', तर त्यांचे पुस्तक 'बायबल'; इस्लामचा प्रेषक 'मोहम्मद', तर पंथग्रंथ 'कुराण'; इराणी पंथाचा पंथग्रंथ 'अवेस्ता', तर प्रेषित 'झरतुष्ट'.

'धर्म' ही संकल्पना यापेक्षा कितीतरी व्यापक आहे. यात एकच प्रेषित आणि एकच धर्मग्रंथ अशी संकल्पना नाहीच. हिंदूंचा एकच 'देव' किंवा 'प्रेषित' नाही. वेदप्रामाण्य मानणारे पंथ जसे यात आहेत तसेच वेदप्रामाण्य न मानणारेही पंथ त्यामध्ये आहेत. म्हणूनच धर्म या शब्दाचे भाषांतर होऊ शकत नाही. Religion म्हणजे 'पंथ'. शिवाय भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे त्यांचे 'दर्शन'ग्रंथ, यांचा देव म्हणजे God (Anthropomorphic, मानवगुणसदृश्य) या संकल्पनेशी फारसा संबंध नाही. पंथांमध्ये 'प्रेषित' आणि 'पूजापद्धती' या एकमेकांना पूरकच असतात. हिंदूंमध्येही देव संकल्पना आणि पूजापद्धती पूरक असल्या तरी त्या मान्य नसलेली व्यक्ती ही धर्मबाह्य होत नाही.


बहुतेक इंग्रज व्यापारी किंवा प्रवासी हे ख्रिस्तपंथी असत. हिंदूधर्माची ही व्यापकता त्यांच्या आकलनाच्या बाहेर होती. नुसता एखादा धर्मग्रंथ वाचून, हिंदूधर्म किंवा भारतीय संस्कृतीचे व्यवहार कळणं कठीण होतं. शिवाय हिंदू पंथीयांमधील मतभिन्नता आणि परस्पर विरोधी चालीरीती, यामुळे तर या गोंधळामध्ये आणखीनच भर पडत होती. या गोंधळाचे प्रतिबिंब सुरुवातीच्या धर्मप्रसारक, व्यापारी, प्रवासी आणि ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी यांनी लिहिलेल्या साहित्यामध्ये दिसून येते. रॉबर्ट क्लाइव्ह आणि वॉरन हेस्टींग यांचे समकालीन असलेल्या काही ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी हिंदू संस्कृती आणि भाषांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला होता.

जॉन हॉलवेल (John Holwell, १७११ – १७९८), अलेक्झांडर डॉव (Alexander Dow, १७३५–१७७९) आणि नॅथानियल हालहेड (Nathaniel Halhed, १७५१–१८३०) या विल्यम जोन्स पूर्व संशोधकांची भूमिका आणि लिखाणाचा परामर्श घेणे म्हणूनच उपयुक्त ठरेल.

### जॉन हॉलवेल

जॉन हॉलवेल यांचा जन्म डब्लिन (Dublin) मधला. यांचे बहुतेक आयुष्य त्यांनी लंडनमध्ये घालवले. यांचे खानदान व्यापारी असले तरी ते डॉक्टर झाले. १७३२ साली त्यांना भारतात कलकत्त्याला पाठवण्यात आले. कलकत्त्याच्या

(पृष्ठ क्र. ४० वर)




व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

**वर्ष एकविसावे/अंक ५/ मे २०२०**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर



'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक ११ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | कॅक्स्टन सभागृह, लंडन | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | कोरोनामुळे शिक्षण क्षेत्रात येऊ घातलेले बदल : एक निरीक्षण | प्रा. नारायण बारसे | ५ |
| ४) | इस्त्रायल, एली कोहेन आणि मोसाद | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ७ |
| ५) | स्वातंत्र्यवीर सावरकरांची कविता | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १४ |
| ६) | ठाणे शहराचे 'वास्तुविशारद शिल्पकार वसंत पानसरे' | प्रा. नारायण बारसे | १६ |
| ७) | काळा कुडा | श्री. प्रकाश दुधाळकर | १९ |
| ८) | मनोज बोरगावकर यांची 'नदीष्ट' कादंबरी | श्री. श्रीपाद अरुण जोशी | २१ |
| ९) | महाराष्ट्राची शान - लोकनृत्यांचा अविष्कार | मनीषा चव्हाण | २४ |
| १०) | प्रिय मित्रास, | श्री. स्वप्नील नंदकुमार मयेकर | ३१ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# कॅक्स्टन सभागृह, लंडन

*लंडन शहरात कॅक्स्टन हॉल हे एक प्रसिद्ध सभागृह आहे. या सभागृहात सभा, संमेलने, तसेच विवाह होत असतात. या सभागृहाला भेट दिल्यानंतर त्याची माहिती देणारा हा लेख आहे - संपादक*

विद्या प्रसारक मंडळाच्यावतीने दरवर्षी मे महिन्यात इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते. या सहलीत ऑक्सफर्ड, केंब्रीज आणि लंडन या शहरांतील शैक्षणिक संस्था, वस्तुसंग्रहालये आणि वाचनालये यांना भेटी देण्याचा भरगच्च कार्यक्रम असतो. लंडन शहरातील वेगवेगळ्या ठिकाणांना भेटी देणे हे या सहलीतील मोठे आकर्षण असते. बकिंगहॅम पॅलेस, ट्रॅफलगर स्केअर, ग्रिनविच ऑब्झर्वेटरी या ठिकाणांना आम्ही भेटी देतो. त्याचबरोबर भारतीय स्वातंत्र्यासाठी झटणारे लोक जिथे राहात असत त्यांच्या घरांना भेटी देतो. तसेच, ज्या ठिकाणी भारतीय लोकांच्या सभा होत असत त्या ठिकाणांना देखील भेट देतो. अशाच एका सभागृहाची माहिती या लेखात दिलेली आहे. त्या सभागृहाचे नाव कॅक्स्टन सभागृह (Caxton Hall) असे आहे.

मागच्या वर्षी आम्ही मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात इंग्लंडला गेलो होतो. २८ मे हा स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा जन्म दिवस. हे औचित्य साधून त्याच तारखेला आम्ही लंडन भेट करायची ठरविली. त्यासाठी आम्ही एक बसची व्यवस्था केली होती. आमच्या राहत्या ठिकाणापासून निघून आम्ही प्रथम शामजी कृष्ण वर्मा यांचे निवासस्थान पाहायला गेलो. शामजी जुनागड संस्थानाचे प्रधान होते. तुम्ही स्वातंत्र्य चळवळीला मदत करता असा आरोप ठेवून त्यांना त्या पदावरून काढून टाकण्यात आले. त्यानंतर ते लंडनला जाऊन राहिले. तिथे त्यांनी एक घर विकत घेऊन त्याचे वसतीगृहात रूपांतर केले. या घराला 'इंडिया हाऊस' या नावाने ओळखले जायचे. सावरकर जेव्हा इंग्लंडला शिकायला गेले तेव्हा ते याच घरात राहत असत. शामजींच्या घरापासून हे ठिकाण जवळच आहे. आम्ही आमचा मोर्चा तिकडे वळवला. इंडिया हाऊस पाहून झाल्यावर आम्ही लोकमान्य टिळक लंडनमध्ये ज्या घरात राहात होते ते ठिकाण पाहायला गेलो. ते झाल्यावर आमची बस वेस्टमिन्स्टर शहराकडे वळली. बराच वेळ प्रवास केल्यानंतर आम्ही कॅक्स्टन सभागृहाजवळ पोहोचलो.




**कॅक्स्टन सभागृह**

कॅक्स्टन सभागृह ही एक ऐतिहासिक वास्तू आहे. वेस्टमिन्स्टर शहर जसे वाढत गेले तसे तेथे सार्वजनिक ठिकाणाची गरज भासू लागली. ती पूर्ण करण्यासाठी त्यांनी एक सभागृह बांधण्याचे ठरविले. सभागृहाचा आराखडा कसा असावा हे ठरविण्यासाठी त्यांनी एका स्पर्धेचे आयोजन केले. त्यातून विल्यम ली आणि एफ. जे. स्मिथ यांनी सुचविलेला आराखडा मान्य केला.

---

कधी कधी देव तुमची परिस्थिती बदलत नाही; कारण त्याला तुमची मनस्थिती बदलायची असते!

त्याबरहुकूम १८८३ मध्ये इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. लाल रंगाच्या विटा आणि गुलाबी रंगाचा दगड यांचा वापर करून इमारतीचे बांधकाम करण्यात आले. त्यामुळे ही इमारत अजूनही अतिशय मोहक अशी दिसते. या इमारतीला 'वेस्टमिन्स्टर टाऊन हॉल' असे नाव देण्यात आले होते. या इमारतीत दोन सभागृह होती. त्यांची नावे 'ग्रेट हॉल' आणि 'यॉर्क हॉल' अशी होती. इसवीसन १९०० मध्ये वेस्टमिन्स्टर शहरासाठी मोठा टाऊन हॉल बांधण्यात आला. त्यानंतर या सभागृहाचे नाव बदलून 'कॅक्स्टन हॉल' असे करण्यात आले. विल्यम कॅक्स्टन यांनी इंग्लंडमध्ये १४७६ मध्ये पुस्तक छपाईची सुरुवात केली. म्हणून त्यांना त्या देशात मानाचे स्थान आहे. त्यांचेच नाव या सभागृहाला देण्यात आले आणि तेच नाव आजदेखील प्रचलित आहे. इमारतीच्या प्रवेश द्वाराजवळच Caxton Hall असे ठळकपणे लिहिलेले आहे.

कॅक्स्टन सभागृहात भारतीय लोकांच्या नियमितपणे सभा होत असत. अशाच एका सभेच्या वेळी १३ मार्च १९४० रोजी उधम सिंग या भारतीय माणसाने मायकेल ओडायर (Michael O'Dwyer) या ब्रिटिश माणसाला गोळ्या घालून ठार मारले. असे धाडसी कृत्य करावे असे त्याला का वाटले हे समजून घेण्यासाठी त्याच्या आधी २१ वर्षांपूर्वी अमृतसरला काय घडले हे समजून घेणे आवश्यक आहे. रोलँड अॅक्टचा विरोध करण्यासाठी सुमारे २० हजार लोकांचा एक मोठा जमाव जालियनवाला बागेत गोळा झाला होता. त्यांचे आंदोलन शांततेत चालले होते. या जमावावर गोळीबार करण्याचे आदेश कर्नल ओडायर यांनी दिले. ते त्या काळात पंजाब प्रांताचे लेफ्टनंट गव्हर्नर होते. या अमानुष गोळीबारात शेकडो भारतीय मारले गेले. गोळ्या लागल्यामुळे विव्हळत प्राण सोडणारे निष्पाप लोक उधम सिंग यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिले होते. त्यामुळे कर्नल ओडायरवर त्यांचा राग होता. जालियनवाला बागेत झालेल्या हत्याकांडाचा बदला घेण्याचे त्याने ठरविले. आपला सूड उगविण्यासाठी तो लंडनला गेला. १३ मार्च १९४० रोजी कॅक्स्टन हॉलमध्ये भारतीय लोकांनी एक सभा आयोजित केली होती. त्यात निवृत्त सनदी अधिकारी या नात्याने कर्नल ओडायरला बोलावण्यात आले होते. ती संधी साधून उधम सिंगने आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. त्यांच्या या कामासाठी त्याच्यावर लंडनच्या कोर्टात खटला चालवण्यात आला. कोर्टाने त्याला मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी ३१ जुलै १९४० या दिवशी पेंटनविल प्रिझनमध्ये उधम सिंग यांना फासावर लटकविण्यात आले.



**कॅक्स्टन हॉलची माहिती देताना डॉ. बेडेकर**

नंतरच्या काळात कॅक्स्टन हॉलमध्ये बरेच बदल करण्यात आले. काही काळ त्याचा उपयोग 'मंगल कार्यालय' म्हणून केला जात होता. अनेक महत्त्वाच्या व्यक्तींचे लग्न या सभागृहात लावण्यात आले आहे. इमारत मोठी करून आणि त्यात सुधारणा करून आता तेथे राहण्यासाठी अपार्टमेंट निर्माण करण्यात आले आहे. मूळचे सभागृह आता इमारतीच्या मागच्या बाजूला आहे.

(पृष्ठ क्र.२३वर)

मोठे व्हायचे आणि यशस्वी व्हायचे तर अपमान गिळायला शिका. उद्या मोठे व्हाल तेव्हा हीच अपमान करणारी लोकं स्वतःचा मान वाढवायचा तुमची ओळख सांगतील!

# कोरोनामुळे शिक्षण क्षेत्रात येऊ घातलेले बदल : एक निरीक्षण

*कोरोना नंतरच्या काळामध्ये आपल्या शिक्षण प्रणालीमध्ये काळाशी सुसंगत असे भरपूर बदल होणार आहेत. या टाळेबंदीच्या काळात आलेल्या अनुभवावरून लेखकाने आपले निरीक्षण या लेखात नोंदवले आहे - संपादक*

कोरोना नंतरच्या काळामध्ये आपल्या शिक्षण प्रणाली मध्ये काळाशी सुसंगत असे भरपूर बदल येऊ घातले आहेत असे वाटते. कोरोनामुळे आपल्यावर लादल्या गेलेल्या या टाळेबंदीच्या काळामध्ये आलेल्या अनुभवावरून मला काही निरीक्षणे नोंदवाविशी वाटतात.

१. या काळामध्ये अनेक स्तरावर अनेक महाविद्यालये, विद्यापीठे आणि विभागांकडून विविध विषयांवर वेबिनारचे आणि विकास कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले गेले. यानिमित्तानं अनेक विषयांतील तज्ज्ञांचे विचार ऐकण्याची संधी घरबसल्या प्राप्त झाली. सर्वच आयोजकांकडून नवनवीन विषयांवर वेबिनार घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला गेला. काही वेबिनारमध्ये तर हजारोंनी आपला सहभाग नोंदवला. अनेक प्राध्यापक व ग्रंथपालांनी विविध वेबिनार मध्ये सक्रिय सहभाग घेऊन आपापल्या विषयातील नवीन प्रवाह आणि तंत्रज्ञानाचे ज्ञान समजून घेतले. असे असले तरी काही वेळा या प्रकारची नोंदणी ज्ञान घेण्यासाठी होती, की फक्त उपस्थितीचे प्रमाण-पत्र मिळवण्यासाठी होती याविषयी शंका निर्माण होण्यासारखी स्थिती होती!

२. कोणत्याही पातळीवरील शिक्षण ही अत्यावश्यक बाब नाही हे या निमित्ताने अधोरेखित झाले! टाळेबंदी उठल्यानंतरही शाळा महाविद्यालये कधी नियमित सुरू होतील याचा कुणालाच अंदाज येत नाही. आणि शाळा-महाविद्यालये जरी सुरू झाली तरीही पालक आपल्या पाल्यांना शाळा-महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष शिक्षण घेण्यासाठी पाठवायला धजावतील असेही वाटत नाही. निदान सुरुवातीच्या काळात तरी त्यांच्या मनामध्ये भीती असेल असे वाटते.

३. महाविद्यालयामध्ये १२० विद्यार्थ्यांच्या वर्गांना पूर्वीप्रमाणे शिकवायला मिळणे हे बहुतेक दुरापास्त दिसते आहे. किंवा वर्गामध्ये १२० विद्यार्थी उपस्थित राहतील याविषयी मनात शंका आहे. आणि म्हणून एकंदरच शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल घडून येईल किंवा आणावा लागेल असे दिसते.

४. ताळेबंदीच्या या काळामध्ये मी स्वत: काही वेबिनारमध्ये सहभागी झालो होतो. काही ठिकाणी वेबिनार मध्ये साधन-व्यक्ती म्हणून व्याख्यानेही दिली. त्याबरोबरच मुंबई विद्यापीठाच्या आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शन केले. यामध्ये प्रकर्षाने एक गोष्ट जाणवली, ती म्हणजे पारंपरिक शिक्षण पद्धतीमध्ये वर्गात जाऊन शिकवण्यापेक्षाही अशा पद्धतीने ऑनलाईन व्याख्याने देणे हे परिणाम - कारक असले तरीही त्यासाठी भरपूर तयारी करण्याची आवश्यकता असते. आणि म्हणून आपण ज्या विषयांमध्ये व्याख्यान देणार आहोत त्याची भरपूर आणि चौफेर तयारी करावी लागते. भविष्यात अशी तयारी करावी लागेल असे वाटते.

५. त्यामुळे वर्षानुवर्षे कधीकाळी काढलेल्या टिपणावरून शिकवण्याची पद्धत आपोआपच मोडीत निघेल.

६. ऑनलाइन पद्धतीमधून आपल्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त

इतरही लोक आपली व्याख्याने पाहू शकतात, ऐकू शकतात, त्याची समीक्षा होऊ शकते म्हणून 'अभ्यासोनी प्रकटावे' लागेल!

७. यापुढे फक्त शिक्षण घेऊन नोकरी मिळेपर्यंत विद्यार्थी न राहता आपण जो विषय शिकवणार आहोत त्या विषयाचे आयुष्यभर विद्यार्थी राहण्याची कला जोपासावी लागेल!

८. आपल्या विषयाचे अध्ययन व ज्ञान मिळवण्याबरोबरच माहिती आणि तंत्रज्ञानाचा परिणामकारक वापर अध्ययन आणि अध्यापनात करण्याच्या दृष्टीने सर्वच शिक्षकांना हे तंत्रज्ञान समजावून घेऊन आत्मसात करावे लागेल. ऑनलाइन पद्धतीमध्ये अभ्यासक्रमाप्रमाणेच शिकवून, विद्यार्थ्यांना संदर्भ ग्रंथांची आणि ऑनलाईन/ऑफलाईन साधनांची यादी द्यावी लागेल.

९. ऑनलाईन पद्धत यशस्वी झालीच तर अशा सर्व व्याख्यानांचा संग्रह महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना उपलब्ध करून घ्यावा लागेल. विद्यार्थी त्यांना हवे तेव्हा व्याख्याने ऐकू शकतील. आणि असे झालेच तर काही काळानंतर उपस्थितीची अटसुद्धा शिथिल होऊ शकते. विशेषतः सामाजिक शास्त्रे आणि मानव्यविद्या शाखांचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेतील का अशीही शंका येते. दूरशिक्षण माध्यमातून अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी प्रवेश घेऊ शकतील.

१०. या पार्श्वभूमीवर अनेक विद्यापीठांनी आपला दूरशिक्षण विभाग हा सशक्त करून शैक्षणिक साधन निर्मितीचे काम सुरू केले आहे.

११. शिक्षणासाठी म्हणून परदेशी जाण्याचे प्रमाण सुद्धा ऑनलाइन पद्धतीमुळे कमी होऊ शकेल आणि परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये भारतात राहूनच प्रवेश घेऊन शिक्षण घेणे शक्य होईल. आणि असे झाले तर भारतीय विद्यापीठांना आणि एकंदर शिक्षणपद्धतीला परदेशी विद्यापीठांच्या दर्जाच्या पातळीवर सामना करावा लागेल!

१२. सध्या अनेक परदेशी विद्यापीठांनी आपले विविध अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने जागतिक पातळीवर सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले आहे. सध्या तरी हे अनेक अभ्यासक्रम फक्त पदविका आणि प्रमाणपत्र पातळीवरच उपलब्ध करून दिलेले असले तरी पण भविष्यात संपूर्ण पदवी अभ्यासक्रम सुद्धा अशा पद्धतीने उपलब्ध होऊ शकतात.

१३. भारतात सुद्धा 'स्वयम्' च्या माध्यमातून अशा प्रकारचे ५०० पेक्षा अधिक अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेले आहेत. अभ्यासक्रमांसाठी अतिशय चांगल्या प्रकारची शैक्षणिक साधन निर्मिती करण्यात आलेली आहे. हे अभ्यासक्रम सामाजिक शास्त्र, मानव्यविद्या, विज्ञान, माहिती-तंत्रज्ञान आणि इतर शाखांमधील विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त आहेत. https://spoken-tutorial.org सारख्या सशक्त माध्यमांमुळे या प्रकारचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या पसंतीस उतरत आहेत. आय आय टी सारख्या अनेक संस्थांनी या प्रकारच्या अभ्यासक्रमाचा विकास करण्यासाठी आपला सक्रिय सहभाग नोंदवला आहे. साईड बाय साईड लर्निंग तंत्रज्ञामुळे या प्रकारच्या अभ्यासक्रमांना निश्चितच चालना मिळणार आहे. मी स्वतः आय आय टी मुंबईने विकसित केलेल्या बारा-बारा आठवड्यांच्या एका अभ्यासक्रमासाठी स्वयमच्या माध्यमातून प्रवेश घेतला आहे. या अभ्यासक्रमासाठी तयार केलेल्या काही tutorials पाहिल्यानंतर अशा प्रकारचे अभ्यासक्रम भविष्यात निश्चितच विद्यार्थ्यांना आकर्षित करतील अशी माझी खात्री पटली आहे.

लिहिण्यासारखे बरेच आहे. पण मला फक्त इतकेच सांगावेसे वाटते की, येणाऱ्या काळामध्ये शिक्षण

(पृष्ठ क्र.१३ वर)

जर तुम्हाला आयुष्यामध्ये खूप संघर्ष करावा लागत असेल, तर स्वत:ला खूप नशीबवान समजा. कारण देव संघर्ष करायची संधी फक्त त्यांनाच देतो, ज्यांच्यामध्ये क्षमता असते!

# इस्रायल, एली कोहेन आणि मोसाद

*इस्रायलच्या मोसाद या गुप्तचर संघटनेचा प्रसिद्ध गुप्तहेर एली कोहेन याच्याविषयी माहिती देणारा लेख- संपादक*

सर्वसाधारणपणे आपल्या असे निदर्शनास येते की, जगातील बहुतेक देशांमध्ये त्यांच्या त्यांच्या गुप्तचर संघटना असतात. या गुप्तचर संघटना साधारणतः दोन प्रकारच्या असतात. एक गुप्तचर संघटना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने देशांतर्गत माहिती गोळा करण्याचे काम करत असते, तर दुसरी गुप्तचर संघटना देशाच्या बाहेर म्हणजेच इतर देशांमध्ये हेरगिरी करून देशहितासाठी आवश्यक अशी गुप्त स्वरूपाची माहिती मिळवत असते.

आपण जगातील अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, रशिया अशा प्रबळ देशांचे उदाहरण घेतल्यास असे लक्षात येते की, या देशांच्या देशाबाहेर वा देशबाह्य हेरगिरी करणाऱ्या गुप्तहेर संघटना आहेत. अमेरिकेची देशाच्या बाहेर हेरगिरी करणारी गुप्तहेर संघटना 'सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी' (सीआयए) या नावाने ओळखली जाते. 'सीआयए' ची स्थापना राष्ट्राध्यक्ष हॅरी टुमन यांच्या काळात १९४७ साली झाली. अमेरिकेच्या या गुप्तहेर संघटनेचे मुख्यालय व्हर्जिनिया राज्यातील फेअरफॅक्स परगण्यातील लँगले या ठिकाणी आहे. इंग्लंडच्या बाह्य गुप्तहेर संघटनेचे नाव 'सिक्रेट इंटेलिजन्स सर्व्हिस' (एसआयएस) असे असून ती एम्आय-६ (मिलिटरी इंटेलिजन्स सेक्शन-६) या नावाने देखील प्रसिद्ध आहे. एम्आय-६ चे मुख्यालय लंडनमधील लॅम्बेथ परगण्यातील वॉक्सहॉल क्रॉस येथील एसआयएस इमारतीत वा एम्आय-६ इमारतीत आहे. फ्रान्स या देशाच्या देशाबाहेर हेरगिरी करणाऱ्या गुप्तहेर संघटनेला इंग्रजी भाषेत 'जनरल डायरेक्टोरेट फॉर एक्सटर्नल सेक्यूरिटी' असे म्हणतात. या संघटनेला फ्रेंच भाषेत 'डायरेक्शन जनरले डे ला सेक्यूरिटे एक्सटेरियूरे'-डीजीएसई ('Direction gμnμrale de la sμcuritμ extμrieure'-DGSE) असे म्हणतात. 'डीजीएस्ई' च्या मुख्यालयाचा पत्ता १४१ बूलवर्ड मॉर्टिअर पॅरिस २० ॲरोंडिस्मेंट (arrondissement) असा आहे. पॅरिस या शहराची विभागणी साधारणपणे वीस ॲरोंडिस्मेंट्स मध्ये झालेली आहे व 'डीजीएसई' चे मुख्यालय विसाव्या (२०) ॲरोंडिस्मेंट मध्ये स्थित आहे. रशियाच्या बाह्य गुप्तचर संघटनेचे नाव 'फॉरेन इंटेलिजन्स सर्व्हिस ऑफ द रशियन फेडरेशन' असे आहे. १९९१ सालापर्यंत रशिया हा सोव्हिएत संघाचा भाग वा घटक होता. सोव्हिएत संघाच्या हेरगिरी करणाऱ्या मुख्य गुप्तहेर संघटनेचे नाव 'केजीबी' असे होते. १९९१ साली सोव्हिएत संघात साम्यवादाचा पाडाव झाला तसेच सोव्हिएत संघाचे विघटन झाले. पूर्वीच्या सोव्हिएत संघातून अनेक राज्ये वा प्रांत बाहेर पडले यापैकीच एक रशिया देखील होता. या सर्व प्रांतांमध्ये रशिया सर्वात मोठा होता. रशियाची राजधानी मॉस्को ही सोव्हिएत संघाची राजधानी होती. भारताच्या गुप्तहेर संघटनेला 'रिसर्च अँड ॲनालिसिस विंग' असे म्हणतात. आपल्या या गुप्तहेर संस्थेची स्थापना २१ सप्टेंबर १९६८ रोजी झाली होती.

देशहितासाठी शत्रूराष्ट्रांमधील संवेदनशील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील इतर महत्त्वाची माहिती गोळा करण्यासाठी आपली एक गुप्तहेर संघटना असावी याची जाणीव पश्चिम आशियातील वा अरबास्तानच्या अती पश्चिमेला वसलेल्या इस्रायल या छोट्याशा देशाला झाली. यातूनच इस्रायलच्या 'मोसाद' या गुप्तचर संघटनेची

अनुभवाने एक शिकवण दिली आहे; कुणाच्या चुका उणीवा शोधात बसू नका.
नियती बघून घेईल; हिशोब तुम्ही करू नका!

१३ डिसेंबर १९४९ रोजी स्थापना झाली. मोसादच्या कार्यपद्धतीवर इस्रायलच्या कुठल्याही घटनात्मक कायद्यांचे बंधन नाही. तसेच या संघटनेचा प्रमुख थेट पंतप्रधानांना व फक्त पंतप्रधानांनाच आपले अवहाल देत असतो. मोसादच्या प्रमुखाला फक्त पंतप्रधानच आदेश देऊ शकतात. यावरून इस्रायलमध्ये मोसाद या संघटनेला असलेले महत्त्व अधोरेखित होते. त्यामुळेच तज्ज्ञ मंडळी मोसादचा उल्लेख इस्रायलमधील एक स्वतंत्र देश असा करतात. आतापर्यंत मोसादने अनेक महत्त्वाच्या व जोखीमपूर्ण कामगिऱ्या फत्ते केलेल्या आहेत.

ज्यूंचे राष्ट्र म्हणून ओळखले जाणारे इस्रायल हा देश १४ मे १९४८ रोजी अस्तित्वात आला. जगातील विविध देशांतील व भागांतील ज्यू लोक आपल्या प्राचीन मायभूमीत परत आले व त्यांनी इस्रायल या देशाची स्थापना केली. ज्यूंच्या इतिहासानुसार इसवीसन ७१ च्या आसपास ज्यूंना रोमन लोकांचे राज्य असताना त्यांची प्राचीन भूमी 'लेवंट' सोडून जावे लागले. अभ्यासकांच्या मते इस्रायल, पॅलेस्टाईन, लेबनान, जॉर्डन व सिरियाचा भूप्रदेश प्राचीन काळात लेवंट म्हणून ओळखला जात असे. तज्ज्ञांच्या मते इस्रायल व ज्यूंचा इतिहास तीन हजार वर्षे एवढा प्राचीन आहे. हिब्रू वा जुन्या बायबलमध्ये ज्याचे वर्णन आले आहे तो ज्यूंचा सर्वात प्रसिद्ध राजा म्हणजे डेविड होय. डेविड लहानपणी मेंढपाळ असतो व ज्यूंचा शत्रू असलेल्या फिलिस्टीन टोळीच्या गोलियथ या बलशाली व धिप्पाड योद्ध्याला द्वंद्वामध्ये पराभूत करून त्याचा वध करतो अशी कथा प्रसिद्ध आहे. डेविड हा गोलियथ समोर वयाने, शरिरयष्टीने व शक्तीने जरी नगण्य भासत असला तरी तो आपल्या बुद्धीच्या बळावर गोलियथवर मात करतो. असे म्हटले जाते की, डेविडने जेरुसलेम शहर ताब्यात घेऊन तो तेथे ज्यू बांधवांना पवित्र असलेली 'आर्क ऑफ द कॉवेनन्ट' तेथे घेऊन गेला. 'आर्क ऑफ द कॉवेनन्ट' चा ज्यूंच्या 'दहा आज्ञा', मोझेस या प्रेषिताचा भाऊ ॲरॉन याच्या हातातील दंड तसेच मना या धान्याच्या भांड्याशी असल्याने ते ज्यू बांधवांना फार पवित्र आहे. येथे नमूद केलेल्या या वस्तू व बाबींविषयकच्या कथा आपणास हिब्रू बायबलमध्ये आढळतात. ज्यूंच्या इतिहासानुसार डेविड या राजानंतर त्याचा पुत्र सोलोमन हा राजा बनतो. सोलोमन या राजाने जेरुसलेममध्ये देवाची उपासना करण्यासाठी 'फर्स्ट टेंपल' उभारले असे म्हटले जाते. 'फर्स्ट टेंपल' 'सोलोमनचे टेंपल' म्हणून देखील ओळखले जाते. हे टेंपल दुसरा नेबूचाडनेझर (Nebuchadnezzar II) याने इसवीसन पूर्व ५८७ च्या आसपास उद्ध्वस्त केले असे म्हणतात. दुसरा नेबूचाडनेझर हा इसवीसन पूर्व ५६२ ते ६०५ या कालावधीत बॅबिलॉनचा (Babylon) राजा होता. बॅबिलॉन ही बॅबिलॉनिया या राज्याची राजधानी होती. बॅबिलॉनियाचे (Babylonia) राज्य मध्य-दक्षिण मेसोपोटेमियामध्ये (Mesopotamia) स्थित होते. प्राचीन मेसोपोटेमिया मध्ये सध्याच्या इराक व कुवैत या देशांचा, तसेच पूर्व सिरिया, आग्नेय तुर्कस्तान व तुर्कस्तान, सिरिया, इराक व इराण या देशांच्या आसपासच्या इतर प्रदेशांचा समावेश होत असे. तज्ज्ञांच्या मते सध्याचा इराक व सिरिया म्हणजेच प्राचीन काळचा बॅबिलॉनिया होय. तसेच बॅबिलॉन हे शहर सध्याच्या बगदाद या शहराच्या नैऋत्येला साधारणतः शहाण्णव किलोमीटर एवढ्या अंतरावर वसलेले होते. बगदाद हे शहर इराकच्या राजधानीचे शहर आहे. आपणास असे संदर्भ आढळतात की, प्राचीनकाळी इजिप्तच्या फारोहांनीसुद्धा (Pharaohas) ज्यूंच्या प्राचीन भूमीवर हल्ला केलेला होता. प्राचीन काळात इजिप्तच्या राजांना फारोहा असे संबोधले जात असे. आपणास अशीदेखील माहिती मिळते की, सध्याचा इस्रायल हा 'इस्रायल' (उत्तरेकडचा भाग) व 'जूद्दा'- दक्षिणेकडचा भाग (Judah) या दोन वेगवेगळ्या राज्यांमध्ये विभागलेला होता. इस्रायलचे हे विभाजन सोलोमनच्या मृत्यूनंतर झाले असे म्हणतात. इस्रायल व जूद्दा या दोन राज्यांमध्ये

अनेकवेळा लढाया झाल्या होत्या असे मत इतिहासकार मांडतात.

इसवीसन पूर्व ६३ च्या आसपास रोमन लोकांनी जेरुसलेम काबीज केले. असे म्हटले जाते की, रोमन लोकांनी ज्यूंची भूमी ताब्यात घेतल्यानंतर बरेचसे ज्यू रोम या शहरात जाऊन व्यापार-उदीम करू लागले. रोमन लोकांचे राज्य सुरू झाल्यावर इसवीसन ७१ पासून मोठ्या प्रमाणात ज्यू त्यांच्या प्राचीन मातृभूमीतून बाहेर पडू लागले असे मत मांडले जाते. त्यामुळे असे म्हणणे सयुक्तिक ठरेल की, साधारणतः दोन हजार वर्षांपूर्वी ज्यूंचे प्राचीन इस्रायलच्या बाहेर स्थलांतर सुरू झाले व ज्यू लोक जगातील विविध भागांमध्ये व युरोपमधील वेगवेगळ्या देशांमध्ये स्थायिक होऊ लागले. बरेचसे ज्यू भारतात देखील आले. भारतात आलेले ज्यू सुरुवातीस प्रामुख्याने महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीवरील भागांमध्ये आले व तेथेच स्थायिक झाले. आजही आपणास मुंबई व ठाणे या शहरांमध्ये ज्यू बांधव आढळतात. इस्रायलची निर्मिती झाल्यावर भारतातील बरेच ज्यू बांधव तेथे गेले, परंतु अनेकांनी भारतातच राहणे पसंत केले. ठाणे शहरात ज्यू बांधव प्रामुख्याने टेंभीनाका व चरई या भागात स्थायिक झालेले आढळतात. ठाण्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयाजवळ ज्यूंचे 'सिनेगॉग' देखील आहे. ज्यूंच्या प्रार्थनास्थळाला सिनेगॉग असे म्हणतात.

आपल्या कष्टाळू स्वभावामुळे ज्यू लोक ज्या कोणत्या देशात गेले तेथे ते त्यांनी निवडलेल्या क्षेत्रामध्ये यशस्वी होत गेले; मग ते शिक्षण, विज्ञान, व्यापार, राजकारण वा इतर कुठलेही क्षेत्र असो. युरोपमधील विविध देशांमध्ये स्थायिक झालेल्या ज्यूंनी तर यशस्वी व्यापारी समुदाय म्हणून नाव व ख्याती मिळवली आणि तो समुदाय सधन बनल्यामुळे तेथील मूळच्या युरोपीय लोकांच्या द्वेषाचा विषय देखील बनले. ज्यू जगाच्या पाठीवरील कुठल्याही देशात राहात असले तरी त्यांनी आपल्या प्राचीन परंपरा, धर्म व भाषेचे जतन केले. त्यांनी आपली हिब्रू ही प्राचीन भाषा पुनर्जीवीत केली व १९व्या शतकाच्या उत्तरार्धापासून तिला फक्त धार्मिक भाषा म्हणून स्तिमीत न ठेवता ती भाषा रोजच्या संभाषणात व लिखाणासाठी वापरू लागले.

कालांतराने युरोपमधील राजकीय घराण्यांच्या वरदहस्ताने युरोपमधील विविध देशांमध्ये ज्यूंवर हल्ले होऊ लागले. ज्यू प्रामुख्याने व्यापारी असल्यामुळे, युरोपीय लोक त्यांना शोषणकर्ते व्यापारी म्हणू लागले. १९व्या शतकात युरोपात ज्यूंवरील हल्ल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. झार शासित रशियात तर राजसत्तेचा ज्यूंवरील हल्ल्यांना उघडपणे पाठिंबा होता. यातूनच ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याच्या उद्देशाने 'झायोनिस्ट' (Zionist) चळवळीची सुरुवात झाली. २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून ब्रिटनचे सरकार झायोनिस्ट चळवळीला व ज्यूंच्या स्वतंत्र देशाच्या मागणीला अनुकूल होते. ब्रिटिश राजकारण्यांनी 'युगांडा स्किम' नुसार सध्याच्या पूर्व आफ्रिकेतील केनिया या देशातील काही भाग ज्यूंना कायमस्वरूपी स्थायिक होण्यासाठी देवूदेखील केला होता. परंतु नंतर जागतिक ज्यू नेत्यांनी ज्यू बांधवांना त्यांची प्राचीन भूमी असलेल्या पॅलेस्टाईन मध्येच स्थलांतर करण्याचे आवाहन केले व ब्रिटिशांनी झायोनिस्ट चळवळीच्या या भूमिकेला पहिल्या महायुद्धाच्या काळात १९१७ साली 'बाल्फर जाहीरनाम्याच्या' माध्यमातून पाठिंबा जाहीर केला.

२० व्या शतकाच्या सुरुवातीपासून ज्यूंचे पॅलेस्टाईन मध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतर होऊ लागले असे म्हणणे वावगे ठरू नये. युरोपमधील ज्यूंच्या या स्थलांतराला प्रामुख्याने पहिले महायुद्ध, जर्मनीमध्ये हिटलर या नाझी हुकूमशहाचा उदय, दुसरे महायुद्ध आदी घटना कारणीभूत होत्या. हिटलरच्या काळात लाखो ज्यूंची निर्दयपणे हत्या करण्यात आली हे अमानुष सत्य तर संपूर्ण जगाला माहिती आहे. तसेच रशियात देखील पराकोटीचा ज्यू द्वेष वाढलेला होता. या सर्व

कारणांमुळे १९३० च्या दशकापासून युरोपमधील व मुख्यतः जर्मनीतील ज्यूंची पॅलेस्टाईनला स्थलांतरीत होण्याची संख्या लक्षणीयरित्या वाढली.

१४ मे १९४८ रोजी पॅलेस्टाईनमध्ये स्थायिक झालेल्या ज्यूंनी आपल्या इस्रायल या स्वतंत्र देशाची घोषणा केली. त्यामुळे आसपासच्या सिरिया, जॉर्डन, इजिप्त, इत्यादी देशांना राग आला. त्यांना असे वाटले की, इस्रायलच्या निर्मितीमुळे त्यांचे तेथे राहणारे पॅलेस्टीनी अरब बांधव त्यांच्या स्वभूमीत बेघर झाले आहेत. त्यामुळे या अरब देशांनी पॅलेस्टीनी अरब बांधवांना पाठिंबा म्हणून इस्रायलवर अनेकदा हल्ले केले. इस्रायल व अरब देशांमध्ये झालेली काही प्रमुख युद्धे म्हणजे सुएझ युद्ध (१९५६), सहा दिवसाचे युद्ध- सिक्स डेज वॉर (१९६७) व योम किप्पूर वॉर वा युद्ध (१९७३) ही होत. या युद्धांव्यतिरिक्त इस्रायल व त्याच्या शेजारी अरब राष्ट्रांमध्ये सततपणे धूसफूस चालूच असल्याचे निदर्शनास येते. तसेच इस्रायलमधील पॅलेस्टीनीयन लिबरेशन ऑर्गनायझेशन- पीएलओ (Palestinian Liberation Organization-PLO) ही पॅलेस्टीनी अरबांची संघटना व इस्रायलच्या लष्करी व सुरक्षा यंत्रणांमध्ये नेहमीच बाचाबाची झाल्याचे वा होत असल्याचे आपण पाहतो.

अशाप्रकारे १९४८ साली अस्तित्वात आल्यापासून इस्रायल हा देश व त्या देशाचे नागरिक सातत्याने परकीय हल्ल्यांच्या सावटाखाली राहत आलेले आहेत किंबहुना आजही त्यांच्या मनात कुठल्याही क्षणी आपल्यावर परकीय हल्ला होऊ शकतो ही खूणगाठ असते वा या विचारासोबतच ते जगत असतात. त्यामुळेच इस्रायलच्या सरकारने आपल्या बाह्य वा परकीय शत्रूंविषयी व त्यांच्या इस्रायलविरोधी विविध योजनांची माहिती गुप्तरीतीने मिळविण्यासाठी तसेच शत्रूविरुद्ध वेळ पडल्यास गुप्तरीतीने कारवाई करण्यासाठी एक गुप्तहेर वा गुप्तचर संघटना स्थापन करण्याचे ठरविले व 'मोसाद'चा जन्म झाला.

१३ डिसेंबर १९४९ रोजी स्थापना झाल्यापासून इस्रायलच्या मोसाद या गुप्तहेर संघटनेने शत्रूविरोधात अनेक खतरनाक व खळबळजनक कारवाया घडवून आणलेल्या आहेत. या संघटनेचे गुप्तहेर आपण कल्पना करू शकणार नाही अशा कारवाया व कृत्ये देशासाठी करत असतात व तसे करण्यासाठी ते सदैव तयार असतात. मोसादच्या अशाच एका नीडर गुप्तहेरांपैकी एली कोहेन हा एक होता.

एली कोहेनचे पूर्ण नाव एलीहाऊ बेन शाऊल कोहेन (Eliahu ben Shaoul Cohen) असे होते. कोहेनला हेरगिरीचे प्रशिक्षण देऊन त्याचे नामकरण कमाल अमीन ताबेत (Kamal amin Thaabet) असे करण्यात आले. एली कोहेनचा जन्म १९२४ साली इजिप्तमधील अलेक्झांड्रिया (Alexandria) या शहरात झाला होता. अलेक्झांड्रिया या शहराचे निर्माण प्राचीन काळातील प्रसिद्ध ग्रीक सम्राट अलेक्झांडर म्हणजेच सिकंदर याने इसवीसन पूर्व ३३२ मध्ये केले होते. असो. एली कोहेनचे आई-वडील मूळचे सिरिया या देशातील ज्यू होते. सिरिया हे पश्चिम आशियातील एक प्रमुख अरब राष्ट्र असून या देशाच्या सीमा इराक (पूर्व), जॉर्डन (दक्षिण), इस्रायल (नैऋत्य), लेबनान (पश्चिम) व तुर्कस्तान (उत्तर) एवढ्या देशांना भिडलेल्या आहेत. १९६१ ते १९६५ या कालावधीत एली कोहेन हा मोसादचा सिरियातील गुप्तहेर म्हणून कार्यरत होता. असे म्हणतात की, एलीचे वडील हे मूळचे सिरियातील अलेप्पो (Aleppo) या शहरातील होते.

कोहेन इजिप्तमध्ये असताना 'झायोनिस्ट' चळवळीशी जोडला गेलेला होता. इजिप्तमधील ज्यूंची तेथे होणाऱ्या छळातून सुटका करण्यासाठी त्याने तेथील अनेक ज्यूंना इस्रायलमध्ये पळून जाण्यासाठी मदत केलेली

होती. तो इजिप्तमध्ये साधारणतः १९५० च्या दशकाच्या मध्यापर्यंत सक्रिय होता व तेथे त्याने इस्राएलच्या गुप्तहेरांना अनेक कामगिरींमध्ये व गुप्त कारवाया घडवून आणण्यात मोठी मदत केली होती. मात्र, इजिप्तच्या सत्ताधाऱ्यांना या कारवायांमधील कोहेनचा सहभाग सिद्ध करता आला नव्हता. यावरून कोहेनच्या अलौकिक बुद्धिमत्तेची व तो किती मुरलेला हेर होता याची प्रचीती येते.

इजिप्तमधील ज्यूंवरील हल्ल्यांत सतत वाढ होत असल्यामुळे एली कोहेन १९५६ साली इस्रायलमध्ये येऊन कायमस्वरूपी स्थायिक झाला. इस्रायलमध्ये आल्यापासून कोहेनची इच्छा मोसादचा गुप्तहेर बनण्याची व त्या माध्यमातून आपल्या देशाची सेवा करण्याची होती. परंतु  जरी कोहेनने मोसादकडे अर्ज केले असले तरी सुरुवातीस त्याचे अर्ज व विनंती मोसादकडून नाकारण्यात आली होती. शेवटी मोसादला कोहेनला गुप्तहेर म्हणून नियुक्त करावे लागले. कोहेनला मोसादने खडतर प्रशिक्षण देऊन अर्जेंटिनाची राजधानी ब्यूनस ऐरस (Bunoes Aires) येथे एका कामगिरीवर पाठविले. बरेच सिरियन अरब अर्जेंटिना या देशात व त्या देशाची राजधानी ब्यूनस ऐरस मध्ये स्थायिक झाले होते. किंबहुना आजही अर्जेंटिनात सिरिया व लेबनान या देशांतील अरबांची संख्या मोठ्या प्रमाणात आढळते.

मोसादने कोहेनला कमाल अमीन ताबेत या नावाने एक सिरियन अरबी व्यावसायिक वा भांडवलदार म्हणून ब्यूनस ऐरसला पाठवले. असे भासवण्यात आले की, ताबेतचे (कोहेन) वडील सिरियाहून अर्जेंटिनाला गेले होते व त्यांनी तेथे मोठे व्यापारी साम्राज्य उभे केले व कमाल अमीन ताबेत हा त्यांचा मुलगा व त्या अनुषंगाने त्यांच्या उद्योग-धंद्यांचा व संपत्तीचा वारसदार होता. कोहेन ऊर्फ ताबेतला तेथील सिरियन अरबांमध्ये व प्रामुख्याने प्रभावशाली अरबांमध्ये मिसळून त्यांच्याशी मैत्री करून त्यांना असे भासवायचे होते की, त्याला आपली मायभूमी सिरियाला परत जाऊन तेथील लोकांसाठी व आपल्या देशासाठी स्वतःच्या पैशाचा उपयोग करून काहीतरी भरीव काम करावयाचे होते.

मोसादने ठरविलेल्या योजनेप्रमाणे कोहेन कमाल अमीन ताबेत या नावाने ब्यूनस ऐरस येथे गेला व त्याने तेथील मातब्बर सिरियन अरबांसोबत मैत्री केली. यात सिरियातील काही प्रभावशाली लष्करी अधिकाऱ्यांचा देखील समावेश होता. कोहेन काही काळानंतर ब्यूनस ऐरस सोडून सिरियात जाऊन दाखल झाला. त्याने तेथे उच्चस्तरीय राजकारणी व लष्करी अधिकाऱ्यांसोबत जवळीक केली. तो अशा प्रभावशाली व उच्चभ्रू लोकांच्या जवळ जाण्यासाठी जंगी मेजवान्यांचे आयोजन करत असे व उपस्थितांना उंची मद्य उपलब्ध करून देत असे. अशाप्रकारे कोहेन  सिरियन लोकांमध्ये मिसळून त्यांच्याकडून महत्त्वाची माहिती बेमालूमपणे काढून घेत असे व ती आपल्या मोसादमधील वरिष्ठांना पाठवित असे. कोहेन त्याने सिरियामध्ये गोळा केलेली माहिती रेडियो प्रसारणाच्या (radion transmission) माध्यमातून वा इस्रायलला गुप्तरित्या भेट देऊन मोसादला देत असे.

कोहेनने सिरियात असताना गोलन हाईट्स या भागाला देखील भेट दिली होती. गोलन हाईट्स हा भूप्रदेश इस्रायल व सिरियाच्या सीमेवरील टेकड्यांयुक्त डोंगराळ भाग आहे. तेव्हा तो सिरियाच्या ताब्यात होता. असे म्हटले जाते की, कोहेनने या भागात जाऊन तेथील एकंदरीतच सिरियाच्या लष्कराच्या हालचालींची व इतर अनेक स्वरूपाची जी माहिती पाठविली तिचा उपयोग इस्रायलला सहा दिवसांच्या युद्धात सिरियाचा पराभव करून गोलन हाईट्स हा प्रदेश जिंकून घेण्यासाठी झाला. कोहेनने सिरियातून पाठविलेली अजून एक अतिमहत्त्वाची माहिती म्हणजे सिरियाने इस्रायलचा शुद्ध पाण्याचा स्रोत बंद करण्यासाठी जॉर्डन नदीचे पात्र गुप्तपणे वळविण्याची आखलेली योजना ही होय.

एली कोहेनचा नाडिया मॅजाल्ड (Nadia Majald) हिच्यासोबत विवाह झाला होता. नाडिया ही मूळची इराकी ज्यू कुटुंबातील होती. एली व नाडियाला एकूण तीन अपत्ये झाली. नाडियाचा मोठा भाऊ सामी मायकेल (Sami Michael) हा हिब्रू भाषेतील सुप्रसिद्ध लेखक असून त्याला अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

अहमद सुदैनी हा सिरियाच्या गुप्तचर संघटनेतील एक उच्चस्तरीय अधिकारी होता व तो सहसा कुणावरही सहजासहजी विश्वास ठेवत नसे. तो एक हाडाचा हेर होता. असे म्हटले जाते की, कुणास ठाऊक त्याला कोहेन ऊर्फ कमाल अमीन ताबीत पसंत नव्हता म्हणून त्याने कोहेनच्या हालचालींवर बारीक नजर ठेवली होती. १९६४ च्या आसपास कोहेनला सिरियात राहून हेरगिरी करणे आता धोकादायक आहे याची जाणीव झाली होती. त्यामुळे त्याने आपल्या मोसादमधील हस्तकांना/वरिष्ठांना इस्रायलला परत येण्याची अनुमती मागितली होती. सिरियन गुप्तचर अधिकाऱ्यांना देखील एव्हाना आपल्यात राहून कोणीतरी हेरगिरी करत आहे व महत्त्वाची व गुप्त स्वरूपाची माहिती आपल्या शत्रुला व प्रामुख्याने इस्रायलला पाठवित आहे याची शंका आली होती. त्यामुळे सिरियाच्या गुप्तचर संघटनेने रशियन गुप्तहेरांच्या मदतीने 'त्या' गुप्तहेराला पकडण्यासाठी सापळा रचला. कोहेनला अनेकदा रेडिओच्या मदतीने गुप्तसंदेश इस्रायलला पाठविण्याची सवय होती. त्याला याबाबतीत असलेल्या धोक्याविषयीची सूचनादेखील देण्यात आली होती. शेवटी त्याच्या या सवयीने / कार्यपद्धतीनेच त्याचा घात केला. कोहेन रेडियोच्या सहाय्याने गुप्तसंदेश पाठवित असताना सिरियन गुप्तहेरांनी त्याच्या रेडियो संदेशांच्या संकेतांचा रशियन गुप्तहेरांच्या मदतीने बरोबर मागोवा वा सुगावा घेत त्याला रंगेहाथ पकडले. तो दिवस होता २४ जानेवारी १९६५. सिरियन सरकारने कोहेनला क्षमा करावी / दया दाखवावी व मृत्युदंड देऊ नये यासाठी इस्रायलच्या सरकारने खूप प्रयत्न केले. परंतु सिरियन सरकारने काहीएक ऐकून घेतले नाही व १८ मे १९६५ रोजी एली कोहेनला सिरियाची राजधानी दमास्कस मध्ये (Damascus) जाहीररित्या फाशी देण्यात आली.

एली कोहेन इस्रायलच्या जनमानसामध्ये ज्याच्याविषयी अतोनात प्रेम आहे असा मोसादचा अमर गुप्तहेर ठरला आहे, ज्याने आपल्या देशासाठी बलिदान दिले. असे म्हटले जाते की, मोसादला कोहेन आपल्या हाताच्या मनगटावर जे घड्याळ घालत असे त्याचा शोध घेऊन ते परत मिळविण्यात यश आले व ते घड्याळ मोसादच्या मुख्यालयात एक आठवण म्हणून आदरपूर्वक ठेवण्यात आले आहे. तसेच इस्रायलने सिरियाकडून गोलन हाईट्स हा प्रदेश जिंकून घेतल्यानंतर तेथील एका भागाला एली कोहेनची आठवण म्हणून त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ 'एलिएड' (Eliad) हे नाव देण्यात आले आहे. एली कोहेनच्या स्मृती जागविण्यासाठी त्याच्याविषयीची माहिती कोरलेली एक शीळा (दगड) जेरुसलेममधील माऊंट हर्झल (Mount Herzl) येथील 'गार्डन ऑफ द मिसिंग इन ॲक्शन' मध्ये (Garden of the Missing in action) ठेवण्यात आली आहे. 'गार्डन ऑफ द मिसिंग इन ॲक्शन' म्हणजे इस्रायलच्या एकंदरीतच संरक्षण यंत्रणांमधील असे महान सुपुत्र, जे आपल्या देशहितासाठी धोका पत्करून महत्त्वाची कामगिरी करत असताना स्वगृही कधीच परतले नाहीत. म्हणजेच त्यांनी आपला प्राणत्याग करून देशरक्षणाला महत्त्व दिले अशा वीरांच्या स्मृती जागवणारे स्मारक होय. इस्रायलच्या अशा हुतात्म्यांना वा वीर सुपुत्रांना 'एम्आयएज्' (MIas) असे म्हटले जाते.

अमेरिकेच्या 'नेटफ्लिक्स' (Netflix) या 'ऑनलाईन' मनोरंजनाच्या क्षेत्रातील कंपनीने २०१९ साली एली कोहेनच्या जीवनावर आधारित एका मालिकेची निर्मिती केली आहे. सदर मालिकेचे शीर्षक 'द स्पाय' (The Spy) असे आहे. या 'नेटफ्लिक्स'

वरील मालिकेमुळे एली कोवहेनच्या स्मृतींना पुन्हा एकदा उजाळा मिळाला. एलीची विधवा नादियादवाला ही हयात असून तिचे वय पंच्याऐंशी वर्षे एवढे आहे. नादियाने नेटफ्लिक्सच्या मालिकेतील काही भागांवर आपली नाराजी दर्शविली होती. परंतु त्या निमित्ताने तिच्या वीर पतीच्या स्मृतींना उजाळा मिळाला यासाठी तिने आनंद देखील व्यक्त केला आहे.

आज इस्रायल हा देश जगातील आर्थिकदृष्ट्या व विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील एक प्रगत व अग्रेसर देश म्हणून ओळखला जातो. १४ मे १९४८ साली अस्तित्वात आल्यापासून हा चिमुकला देश जवळजवळ दररोज आपल्या बाह्य शत्रूंसोबत यशस्वी झुंज देत आहे, नव्हे या देशाने आपल्या शत्रूंना सदैव पराजीत वा चीत केले आहे. आजही हा देश परकीय हल्ल्याच्या सावटाखाली जगत आहे. मात्र हा देश आपल्या शत्रूंना सडेतोड उत्तर देण्याची क्षमता ठेवतो याचे कारण या देशात देशासाठी प्राणत्याग करण्यासाठी सदैव तयार असलेले अनेक एली कोहेन आहेत. इस्रायलच्या संरक्षणात निश्चितपणे मोसाद या गुप्तचर संघटनेचा व तिच्या अगणित कात्सांचा (katsa) सिंहाचा वाटा आहे. मोसादच्या प्रत्यक्षात हेरगिरी करणाऱ्या हेरांना 'कात्सा' असे म्हटले जाते. मोसादने हिटलरच्या काळात जर्मन ज्यूंची कत्तल करणाऱ्या व हिटलरने आत्महत्या केल्यावर व दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाल्यानंतर जर्मनीतून पळ काढणाऱ्या अनेक नाझी नेत्यांना जगाच्या विविध कानाकोपऱ्यांतून ते लपून बसलेल्या ठिकाणांहून शोधून काढले. तसेच त्यांना इस्रायलला आणून तेथील कायद्याप्रमाणे मृत्युदंड देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यावरून मोसाद ही जगातील किती कार्यक्षम व खतरनाक गुप्तहेर संघटना आहे हे सिद्ध होते.

ज्या देशात एली कोहेन सारखे महान सुपुत्र जन्माला येतात व मोसादसारख्या गुप्तहेर संघटना असतात त्या देशाला क्वचितच परकीय सत्ता हरवू शकतात. इस्रायल या देशाचे नागरिक खरोखरच सुदैवी आहेत की त्यांच्याकडे देशरक्षणासाठी त्याग करणारे 'कोहेन' तर मोठ्या प्रमाणात आहेतच; परंतु सोबतच सतत डोळ्यांत तेल घालून इस्रायलच्या रक्षणासाठी तत्पर असणारी मोसादसारखी गुप्तचर संघटना देखील आहे.

**संदर्भ :**

गिडियॉन्स् स्पाईज् : द सिक्रेट हिस्ट्री ऑफ द मोसाद: गॉर्डन थॉमस

द ग्रेटेस्ट मिशन्स ऑफ द इस्रायली सिक्रेट सर्व्हिस: मोसाद : मायकेल बार-जोहर व निस्सीम मिश्र

फ्रॉम द होली माऊंटेन : अ जर्नी इन द शाडो ऑफ बायझेनटिअम : विल्यम डॅलरिम्पल

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

●●●

---

(पृष्ठ क्र. ६ वरून - **कोरोनामुळे शिक्षण क्षेत्रात येऊ घातलेले बदल : एक निरीक्षण**)

संस्थांनाच नव्हे तर शिक्षकांनाही आपला दर्जा सुधारावा लागेल आणि तो टिकवावा लागेल आणि त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नरत राहावे लागेल. नाहीतर "perform or perish' या उक्तीचा अनुभव मिळू शकेल. यापुढे शिक्षणक्षेत्रात सुद्धा survival of fittest प्रत्यक्षात येण्याची नांदी यानिमित्ताने सुरू झाली आहे असे वाटते.

**प्रा. नारायण बारसे**
ग्रंथपाल,
जोशी-बेडेकर महाविद्यालय,
ठाणे

# स्वातंत्र्यवीर सावरकरांची कविता

*२८ मे रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची १३७ वी जयंती आहे. यानिमित्त त्यांच्या काव्यप्रतिभेवर प्रकाश टाकणारा डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांचा लेख – संपादक*

'मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी वयाच्या पंधराव्या वर्षी प्रतिज्ञा घेणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे जीवन म्हणजे भारतीयांसाठी एक मोठा ऊर्जेचा स्रोत आहे. त्यांची १३७ वी जयंती २८ मे रोजी जगभर साजरी केली जाते. इंग्रजी राजवटीपासून भारताची मुक्तता करण्यासाठी चालवलेल्या क्रांतिकारी चळवळीचे अग्रदूत म्हणून सावरकरांचे योगदान मोठे आहे. चाफेकर बंधूना झालेल्या फाशीच्या शिक्षेचा कोवळ्या वयातील सावरकरांवर मूलगामी परिणाम झाला. सशस्त्र क्रांती, बलोपासना, स्वदेशी, राष्ट्रप्रेम इत्यादी विषयांवर सावरकरांची अगाध श्रद्धा होती. लोकमान्य टिळकांना त्यांनी मनोमन आपले गुरुपद बहाल केले होते. सावरकर हे केवळ स्वातंत्र्यवीर नव्हते तर एक महाकवी, भाषाशास्त्रज्ञ, भाषाशुद्धी चळवळीचे प्रणेते, नाटककार, कथा, लेखक, वक्ते व दार्शनिक होते.

सावरकरांची कविता बहुप्रसवा होती. वयाच्या ११ व्या वर्षी त्यांनी 'श्रीमंत सवाई माधवराव' यांच्यावर फटका लिहिला व वयाच्या १५ व्या वर्षी 'स्वदेशीचा फटका' लिहिला. १९६५ साली प्रकाशित झालेल्या 'समग्र सावरकर वाङ्मय' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटलं आहे की, 'सावरकरांचे काव्य हे जीवनात प्रतिभेतून निर्माण झालेले असून त्यांच्या कोणत्याही चार स्फुट कविता घेतल्या तरी महाराष्ट्रातील नामवंत कवीत त्यांची अग्रस्थानी गणना होऊ शकेल. त्यांनी अनेक विषयांवर कविता लिहिल्या असून त्यांची प्रत्येक कविता देशप्रेमाने ओथंबलेली, वीररसाने भरलेली, प्रतिभेच्या विपुलतेने चमकणारी आणि तत्त्वज्ञान व ध्येयवाद यांचा उद्घोष करणारी असून महाकवीच्या कोणत्याही कसोटीवर विचार करताना स्वा. सावरकरांना महाकवी हेच विशेषण योग्य ठरते.'

१० नोव्हेंबर १९५० च्या दैनिक काळच्या दिवाळी अंकात नोंदवले आहे की, महाकवी हे उपपद एखाद्या कवीस दोन अर्थानी लावतात. एक, ज्याची प्रतिभा उज्ज्वल व जो जीवनाचे भव्योदात्त दर्शन घडवितो तो महाकवी किंवा, जो महाकाव्य (EPIC) नावाचा काव्यप्रकार रचतो तो. पहिल्या अर्थी शेक्सपिअर, भवभूती नि बाण यांना महाकवी म्हणतात. दुसऱ्या अर्थी महाकाव्य लिहिणारे टासो, माघ, भारवी, श्रीहर्ष इत्यादींना महाकवी म्हणतात. सावरकर या दोन्ही अर्थी महाकवी आहेत

'कमला' या महाकाव्याची रचना करताना सावरकरांनी 'वैनायक' या विशेष वृत्ताची निर्मिती केली. मराठी भाषेच्या काव्यात्म जाणिवेस वैनायक हा सुंदर नजराणा आहे. सावरकरांची संपूर्ण कविता सुमारे १३,५०० ओळींची भरेल. सावरकरांची कविता या नावाने त्यांची कविता १९४३ साली प्रकाशित करण्यात आली आहे. त्यांनी 'उ:शाप', 'सन्यस्त खड्ग' व 'उत्तरक्रिया' अशी तीन संगीत नाटके लिहिली. आजही सावरकरांनी लिहिलेली 'शतजन्म शोधिताना', 'मर्मबंधातली ठेव ही' इत्यादी नाट्यपदे मोठ्या रसिकपणे गायिली जातात.

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. स. गं. मालशे म्हणतात

आपण झोपेत पाहतो ते खरे स्वप्न नसते, तर आपली झोप उडवते तेच खरे स्वप्न असते.

की, 'मिल्टन सारखी पारंपरिक उपमा, रूपके रचावी सावरकरांनीच. त्यांच्या भावना जेव्हा कोमल, अगदी हळव्या बनतात तेंव्हा त्यांचे शब्दरूप महाकवीच्या प्रासादिकवाणीप्रमाणे आविष्कृत होते. 'सांत्वन' मधल्या ओव्या किंवा 'कि घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने' ह्या सारखे श्लोक व्यास–वाल्मीकींच्या, श्रीधर –मुक्तेश्वरांच्या वाणी सारखे दिव्य आणि प्रासादिक वाटतात.

सावरकरांनी आर्या, शार्दुलविक्रिडीत, इंद्रवज्रा, वसंततिलका इत्यादी वृत्त चपखलपणे कवितेत वापरले आहेत. त्यांनी लिहिलेली 'श्री टिळक स्तवन' ही आर्यावृत्ताचा अजोड नमुना आहे. १९०२ साली सावरकर फर्गसन महाविद्यालयात विद्यार्थी असताना 'आर्य संघ' साठी दर आठवड्याला म्हणण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांवर 'जय देव, जय देव, जय जय शिवराया' ही आरती लिहिली. पोवाडा, फटका, आदी काव्यप्रकारांसह सावरकरांनी वीररसा बरोबरच शृंगार देखील सिद्धहस्तपणे हाताळला आहे. आपला मुलगा प्रभाकर हा लहानपणीच वारला तेंव्हा सावरकर लंडन मुक्कामी होते. तेव्हा त्यांनी 'प्रभाकरास' नावाची कविता पुत्र स्नेहाने दुःखद होऊन लिहिली. ही कविता सावरकरांनी आपल्या 'शिखांचा इतिहास' या ग्रंथाला अर्पणपत्रिका म्हणून लिहिली.

१९०६ साली कायद्याची पदवी घेण्यासाठी सावरकर इंग्लंडला रवाना झाले. त्यावेळी बोटीने समुद्र प्रवास करताना प्रियजनांच्या विरहाला मुखरित करीत 'सुनील नभ हे सुंदर नभ हे' ही कविता लिहिली. १९०९ साली ब्रायटनच्या समुद्र किनाऱ्यावर सावरकरांनी 'सागरा प्राण तळमळला' ही अजरामर कविता लिहिली. त्यात ते म्हणतात की –

'नभी नक्षत्रे बहुत एक परी प्यारा, मज भरतभूमीचा तारा
प्रासाद इथे भव्य परी मज भारी, आईची झोपडी प्यारी'

'सांत्वन' व 'माझे मृत्युपत्र' या दोन ऊर्जस्वल कविता सावरकरांच्या लेखणीतून लंडन वास्तव्यात मूर्त झाल्या. या दोन्ही कविता त्यांनी आपल्या वहिनींना उद्देशून लिहिल्या असून ह्या कविता म्हणजे सावरकरांच्या काव्यप्रतिभेचा कळस आहे. माझे मृत्युपत्र या कवितेत सावरकर लिहितात की, 'जर आम्ही सात भाऊ असतो तरीही त्या सर्वांनी  देशसेवेसाठी प्राणार्पण केले असते.'

हे मातृभूमी तुजला मन वाहियेले
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेले
तुतेची अर्पिली नवी कविता रसाला
लेखाप्रती विषय तूची अनन्य झाला

सावरकरांच्या कवितेचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे ते आपली कविता मातृभूमीच्या मुक्तीसाठी अर्पण करतात. त्यांच्यासाठी मातृभूमीपेक्षा श्रेष्ठ काहीच नव्हतं. त्यांच्या बद्दल असं म्हटलं जात असे की, "If at all there was any sweetheart in his life, that was his motherland".

सावरकरांची इंग्रजी कवितेची जाण देखील उच्च दर्जाची होती. त्यांनी लिहिलेली 'The Revolutionist to Himself' ही कविता त्यांच्यावरील असलेल्या ज्येष्ठ इंग्रजी कवी जॉन मिल्टनचा प्रभाव दाखवते. इंग्रजी, संस्कृत, मराठी सोबतच त्यांचे उर्दू भाषेवर देखील प्रभुत्व होते. हिंदूत्वाची व्याख्या करणारा व संस्कृत प्रचुर मराठी वापरणारा सावरकरांसारखा एक तत्त्वज्ञ जेंव्हा उर्दू भाषेचा साज आपल्या काव्यप्रतिभेस चढवतो तेंव्हा त्यांच्या तरल भावाविश्वाचे दर्शन होते. २०१३ साली अभ्यासकांना सावरकरानी लिहिलेल्या काही उर्दू गझल सापडल्या.

त्यातील काही शेर असे :

यही पाओगे मेहशरमें जबां मेरी, बयाँ मेरा
मैं बंदा हिंदवाला हूँ, यही हिंदोस्ताँ मेरा।
मेरा है रक्त हिंदी, जात हिंदी, ठेठ हिंदी हूँ
यही मजहब, यह फिर्का, यही हैं खानदाँ मेरा।

(पृष्ठ क्र. ३० वर)

# ठाणे शहराचे 'वास्तुविशारद शिल्पकार वसंत पानसरे'

*वास्तुविशारद वसंत पानसरे यांचे गुरुवार दिनांक २८ मे २०२० रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. – संपादक*

ठाणे शहराच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचा वाटा असणारे जुन्या पिढीतील नामवंत आणि सर्जनशील वास्तुविशारद श्री. वसंत पानसरे यांचे गुरुवार दिनांक २८ मे २०२० रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मुत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते. जुन्या पिढीतील अनेक ठाणेकरांना पानसरे साहेबांचे नाव परिचित होते. वयाच्या ८८ व्या वर्षापर्यंत ते कार्यरत होते आणि कामानिमित्त विविध साईट्ना भेटीही देत असत. अलीकडच्या काळात प्रकृती कारणास्तव त्यांनी आपला व्यवसाय थांबवून घरी आराम करणे पसंत केले होते. पानसरे साहेबांच्या दुःखद निधनाची बातमी समजली आणि त्यांच्याविषयीच्या आठवणींना उजाळा देण्याच्या दृष्टीने त्यांच्या कार्यकर्तृत्वाची थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.



ठाण्यातील अतिशय जुने-जाणते, जबरदस्त निरीक्षणक्षमता आणि सौंदर्यदृष्टीचे वरदान लाभलेले, रहिवाशी इमारती, बंगले आणि सार्वजनिक वापराच्या इमारतींचे जाणकार वास्तुविशारद म्हणून वसंत पानसरे यांचा नावलौकिक होता. त्याचबरोबर अनेक वास्तूंच्या अंतर्गत सजावटीवर त्यांच्या कल्पकतेची छाप उमटली आहे.

प्रत्येक शहराची विशिष्ट अशी एक ओळख असते आणि ही ओळख घडवण्यासाठी किंवा निर्माण करण्यासाठी त्या शहरातील सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्राचा फार मोठा वाटा असतो. काही व्यक्तीसुद्धा एखाद्या शहराची ओळख ठरू शकतात किंवा एखाद्या शहराच्या नावासोबत त्या व्यक्तीचे नाव जोडले जाते. याचे कारण म्हणजे या व्यक्तीने आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा या शहराच्या जडणघडणीमध्ये आणि उभारणीमध्ये उमटवलेला असतो. ठाणे शहराच्या जडणघडणीमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे एक महत्त्वाचे नाव म्हणजे वास्तुविशारद वसंत पानसरे हे होय.

ठाणे शहराचे वैभव असलेली सांस्कृतिक ठाण्याची ओळख सांगणारी, ठाण्यातील सर्व सांस्कृतिक कार्यक्रमांची व घटनांची केंद्रबिंदू राहिलेली वास्तू म्हणजेच 'राम गणेश गडकरी रंगायतन'. या वास्तूचे तसेच ठाणे महापालिकेचे मुख्यालय असलेली सध्याची इमारत या वास्तू घडवण्यामध्ये प्रमुख वास्तुविशारद म्हणून त्यांचा मोठा वाटा होता. ठाणे शहराचे शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य शिक्षण संस्था असलेल्या 'विद्या प्रसारक मंडळा'च्या ज्ञानद्विप या संकुलातील सर्व वास्तूंच्या नियोजनामध्ये वास्तुविशारद म्हणून त्यांनी काम पाहिले होते. विद्या प्रसारक मंडळाचे

संस्थापक अध्यक्ष असलेल्या कै. वा. ना. बेडेकर यांच्यासोबत त्यांनी १९६९ पासून या संकुलाच्या विकासामध्ये वास्तुविशारद या नात्याने त्यांचे योगदान दिले आहे. कोणतीही वास्तू उभारताना ती वास्तू कोणत्या कारणासाठी वापरली जाणार आहे त्याचा अतिशय बारकाईने अभ्यास करून ते वास्तूच्या आराखड्याची आखणी करीत असत आणि आपण निर्माण केलेली वास्तू त्या क्षेत्रातील वास्तूंसाठी एक आदर्श वस्तुपाठ ठरावा याकडे त्यांचा कल असे. विद्या प्रसारक मंडळाच्या संकुलात असलेले कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांचे स्मृतीशिल्प उभारताना सुद्धा त्यांनी किती बारकाव्यांचा विचार केला होता हे त्यांच्याकडून ऐकून समजले होते. त्याचबरोबर या स्मृतीशिल्पावर मेघडंबरी का काही याचे सुद्धा त्यांनी सौंदर्यशास्त्राच्या अंगाने विवेचन केल्याचे स्मरते. विद्या प्रसारक मंडळाच्या वेळणेश्वर येथील महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आखणीच्या वेळी त्यांनी आपली भूमिका विशद करताना त्यांच्या कल्पनेत असलेले संकुल आणि त्यातील इमारती कशा असतील याविषयी वास्तुविशारद म्हणून केलेले विवेचन नवीन वास्तुविशारदकांना नक्कीच अभ्यासण्यासारखे आहे. त्यांनी सांगितले होते की, समुद्रापासून जवळच असलेल्या या संकुलातील पाच इमारती या समुद्रातील पाच जहाजांसारख्या भासतील. या सर्व इमारती आज तयार असून अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू आहे. विशेष म्हणजे या इमारतींवर गेल्यानंतर आपणासमोर असलेली समुद्रातील जहाजे ही जमिनीपेक्षा उंचीवर दिसतात. विद्या प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक संकुलाच्या उभारणीमध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने मानाची पगडी प्रदान करून त्यांचा यथोचित गौरव केला होता. कोणत्याही वास्तूची आखणी करीत असताना ते समोरच्या व्यक्तीचे शांतपणे ऐकून घेत व नंतर आपले मतप्रदर्शन करीत. जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची पुनर्रचना करत असताना ग्रंथपाल म्हणून त्यांच्या सोबत काही चर्चा झाल्या होत्या. श्री चंदुभाई ठक्कर हे त्यांना ग्रंथालयात घेऊन येत असत. काहीही बदल चंदुभाईंच्या माध्यमातून त्यांना सुचवले तर ते म्हणायचे की, मी स्वतः तिथे येऊन पाहणार आणि मग ठरवणार. छोट्या छोट्या गोष्टींसाठी अनेकदा ८० च्या जवळपास वय असताना दुसऱ्या मजल्यावरील ग्रंथालयात ते स्वतः चंदुभाईं सोबत यायचे. एखादा बदल वास्तुविशारद म्हणून त्यांना तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची खात्री असल्याशिवाय ते मान्य करीत नसत. असे असले तरी प्रत्येक कृतीमागील त्यांची भूमिका ते समोरच्याला विशद करत असत. सुरुवातीला अतिशय कडक स्वभावाचे वाटणारे पानसरे साहेब किती मृदू आणि समजून घेणाऱ्या स्वभावाचे आहेत याचा प्रत्यय मला त्या काळात आला आणि त्यांच्या विषयीचा आदर खूपच वाढला. एवढा प्रचंड अनुभव पाठीशी असताना आणि स्वतःला सिद्ध केलेले असताना माझ्यासारख्या ग्रंथापालाच्या सूचनांचा अंतर्भाव त्यांनी ग्रंथालयाच्या आखणीमध्ये केला हा माझा मला गौरव वाटतो.

वास्तुविशारद क्षेत्रातील आपल्या सत्तर वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवांतून आणि कार्यकर्तृत्वातून पानसरे साहेबांनी या क्षेत्रामध्ये आपल्या नावाचा विशेष दबदबा निर्माण केला होता. म्हणूनच या क्षेत्रामध्ये सर्वत्र त्यांचे नाव अतिशय आदराने घेतले जाते.

पानसरे साहेबांसोबत काम केलेले त्यांचे जुने सहकारी त्यांच्याबाबतीत सांगतात की, अतिशय शिस्तबद्ध, नगरपालिका आणि महापालिका यांच्या नियमाचे काटेकोर पालन करूनच कोणतेही काम करण्याकडे त्यांचा कटाक्ष असायचा. असेही सांगितले जाते की, ठाण्यातले ते एकमेव असे वास्तुविशारद होते की जे नगरपालिका/महानगरपालिकेत एखाद्या इमारतीचा किंवा बंगल्याचा आराखडा मंजुरीसाठी दिल्यानंतर बरोबर

९० दिवसात परवानगी आली नाही तर ते नियमाप्रमाणे कामाला सुरवात करायचे! कारण एकतर ते काटेकोरपणे नियमाला धरूनच काम करायचे व संबंधित खात्याने पण दिलेल्या मुदतीत आराखडा मंजूर करणे बंधनकारक असायचे!!

पूर्वीपासून ठाणेकर असलेल्या पानसरे कुटुंबीयांचे शतकाहून अधिक काळ ठाण्यामध्ये वास्तव्य आहे. ठाण्याच्या नौपाडा भागात घर आणि कार्यालय असलेल्या वसंत पानसरे यांचे शालेय शिक्षण ठाण्याच्या न्यू इंग्लिश शाळेतून झाले. १९४६ मध्ये मुंबईतल्या रुइया महाविद्यालयातून त्यांनी विज्ञान शाखेची पदवी मिळवली. महाविद्यालयीन शिक्षणानंतर त्यांनी मुंबई महापालिकेच्या लेखा विभागामध्ये नोकरी केली. परंतु व्यवसायाची ओढ असल्याने ते या नोकरी मध्ये जास्त काळ रमले नाहीत व त्यांनी आपल्या छंदापोटी टेलरिंग व्यवसाय सुरू केला. मूळत: कलेची आवड असलेल्या पानसरे यांनी पुढे हा व्यवसाय सोडून जे जे कला महाविद्यालयातून वास्तुविशारदचा अर्धवेळ अभ्यासक्रम पूर्ण केला आणि या विषयाच्या पुढील शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले व वास्तुविशारद क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान त्यांनी अवगत केले.

भारतात परतल्यानंतर त्यांनी आर्किटेक्ट असोसिएट्स कंपनीत नोकरी केली व प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतला. या कंपनीमध्ये त्यांनी वास्तुविशारद शास्त्रातील आपले गुरू गॉफ यांच्याकडून या क्षेत्रातील पुढील धडे गिरवले. या कंपनीमध्ये काम करत असताना त्यांनी मुंबईतल्या अनेक उंच इमारती, शैक्षणिक संस्था आणि सार्वजनिक वापराच्या इमारती उभारण्याचा दांडगा अनुभव घेतला.

या अनुभवामुळेच १९७५ च्या सुमारास ठाण्यामध्ये एक अद्ययावत नाट्यगृह उभारण्यासाठी वसंत पानसरे यांची वास्तुविशारद म्हणून निवड झाली आणि त्यांच्या अनुभवाच्या जोरावर त्यांनी ठाण्याचे वैभव ठरावे अशा राम गणेश गडकरी रंगायतन या वास्तुची निर्मिती केली आणि पुढे हीच वास्तू ठाणे शहराचे वैभव आणि सांस्कृतिक ओळख बनली. एवढेच नव्हे तर ठाणे शहरातील सांस्कृतिक घडामोडींचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून गडकरी रंगायतनकडे पाहिले जाते. गडकरी रंगायतनची आखणी करताना पानसरे यांनी आपला अनुभव आणि अभ्यासाच्या माध्यमातून नाट्यगृहासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा विचार करून रंगायतनाची आखणी केली. तालमीसाठी खोली, एकाच वेळी दोन कार्यक्रमांच्या कलाकारांसाठी वेगवेगळ्या मेकअप खोल्या, कलाकारांना वेळ प्रसंगी राहता यावं म्हणून छोटेखानी खोल्या, तसेच कला प्रदर्शनासाठी मोठा परिसर इत्यादींचा समावेश असलेले कलेचे एक परिपूर्ण व्यासपीठ म्हणून रंगायतनाची निर्मिती केली. गडकरी रंगायतनच्या रंगमंचाच्या पडद्याच्या निर्मितीमध्ये सुद्धा त्यांनी विशेष लक्ष घालून आपल्या सौंदर्य दृष्टीची छाप त्यावर उमटवली आहे. त्याकाळात फक्त या पडद्यासाठी ८० हजार रुपये खर्च केले होते! आजही नाट्यगृहाचा एक आदर्श वस्तुपाठ म्हणून गडकरी रंगायतनकडे पाहिले जाते. असे सांगितले जाते की, गडकरी रंगायतन पाहिल्यानंतर खुद्द पु. ल. देशपांडे यांनी पुण्यातले बालगंधर्व नाट्यगृह घडवताना काही बाबी त्यांच्याकडून राहून गेल्याची खंत व्यक्त करून, रंगायतनच्या वास्तू बाबत पानसरे यांची पाठ थोपटली होती.

मुंबई आणि ठाणे शहरातील प्रमुख वास्तू आपल्या विशिष्ट शैलीतून घडविणाऱ्या आणि ठाणे शहराला सांस्कृतिक ओळख मिळवून देण्यात सिंहाचा वाटा असलेल्या वसंत पानसरे यांचे योगदान ठाणे शहर कधीही विसरणार नाही अशा या कर्तृत्ववान वास्तुविशारद म्हणून नामांकित असलेल्या कै. वसंत पानसरे यांच्या पवित्र स्मृतीला विनम्र श्रद्धांजली.

**– प्रा. नारायण बारसे**

●●●

तुमच्या अपयशाला कवटाळून बसू नका. त्याच्या पासून शिका आणि पुन्हा सुरुवात करा.

# काळा कुडा

*'काळा कुडा' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे – संपादक*

मित्रांनो, आयुर्वेद ही भारताने जगाला दिलेली अमोल देणगी आहे. विविध प्रकारच्या वनस्पतींनी समृद्ध असा हा देश त्या वनस्पतींच्या औषधी गुणांची माहिती असणारा होता. आजही ग्रामीण भागात आपण गेलो तर एखादा लहान मुलगा देखील त्यांच्या परिसरातील झाडांची नावे पटापट सांगतो. त्यातील काही जणांना त्यांच्या औषधी गुणांची देखील माहिती असते. अजूनही अशा अनेक वनस्पती आहेत की ज्यांची माहिती फक्त त्या भागातील ग्रामीण तसेच आदिवासी लोकांनाच माहीत आहे. शहरी माणूस यापासून अगदी अनभिज्ञ आहे. त्याला दोन कारणे आहेत. एकतर, शहरी माणसाची नाळ निसर्गापासून तुटलेली आहे आणि दुसरे म्हणजे, इंग्रजांनी आणलेले ज्ञान तेवढे उपयोगी किंवा पाश्चात्यांनी केलेल्या गोष्टींचे अनुकरण करण्याची वृत्ती. त्यामुळे आपल्याकडे असलेला निसर्गाच्या ज्ञानाचा किंवा वनस्पतींच्या गुणधर्माचा अनमोल ठेवा आपण विसरत चाललो आहोत. आपल्या बऱ्याच सणांमध्ये, तसेच विविध धार्मिक विधींमध्ये विविध वनस्पतींचा वापर होतो. त्याला काही संयुक्तिक कारणे आहेत. पण देवाच्या व धर्माच्या बाबतीत आपले सारे वैज्ञानिक ज्ञान व चिकित्सक वृत्ती गहाण ठेवून आपण केवळ आंधळेपणाने सर्व विधी करीत असतो. यातील काही गोष्टी केव्हाच कालबाह्य झालेल्या आहेत व काही अजूनही उपयुक्त आहेत. पण त्यामागील कारणमीमांसा कुणी समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. समाजातील काही स्वार्थी लोक त्यांच्या फायद्यासाठी अशा कालबाह्य गोष्टींचा आग्रह धरत असतात. यात वनस्पतींचा हकनाक बळी जातो. वनस्पती आमच्या दैनंदिन जीवनात अन्न, वस्त्र व निवारा या स्वरूपात उपयोगाच्या आहेत. तशाच, आमच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी देखील औषधे म्हणून उपयोगाच्या आहेत. आपल्या त्वचेची काळजी घेणारी अशीच एक वनस्पती आहे 'काळा कुडा.'



हे एक मध्यम उंचीचे झाड असून उंची ७ मीटर पर्यंत वाढते. भारतीय उपखंडात सर्वत्र दिसणारे असे हे पानगळीचे झाड आहे. काळा कुडा इंग्रजीत Pala Indigo म्हणून ओळखला जातो. याचे शास्त्रीय नाव आहे

Wrightia Tinctoria. स्कॉटीश वनस्पतीशास्त्रज्ञ विल्यम राईट याच्या सन्मानार्थ हे नाव दिले आहे. याला 'गोड इंद्रजव' म्हणूनही ओळखतात. हे झुडूप सदृश्य झाड असून, फांद्या वाकड्यातिकड्या वाढणारे आहे. त्यामुळे नियमित असा आकार नसतोच. याची ओळख पटते ती याच्या हिरव्यागार भालाकार पानांमुळे, तसेच विशिष्ट शेंगांमुळे. पाने ७ ते १५ सें. मी. लांब व ५ ते ७ सें. मी. रुंदीची, गुळगुळीत व चिकयुक्त अशी व संमुख (समोरासमोर) असतात. फुले पांढरी व सुवासिक असतात. याचे वैशिष्ट्य फुलांच्यामध्ये पुंकेसराची असलेली झालर. पांढऱ्या कुड्याच्या फुलांमध्ये अशी झालर नसते. फांदीच्या टोकाशी विरळ स्वरूपात हे फुलांचे झुबके असतात. साधारण मार्च ते जून हा याच्या फुलण्याचा काळ.

याची फळे म्हणजे याच्या वैशिष्ट्य पूर्ण शेंगा. या शेंगा १५ ते २० सें. मी. लांबी व १ सें. मी. रुंदीच्या असतात. एकाच ठिकाणातून दोन शेंगा निघालेल्या व टोकाशी जोडलेल्या अशा; म्हणजे देठाजवळ व टोकाजवळ दोन्ही ठिकाणी या जोडलेल्या असतात. आकार एखाद्या चिनी म्हाताऱ्याच्या मिशांसारखा. पांढऱ्या कुड्याच्या शेंगा देखील अशाच असतात. पण त्या टोकाशी जोडलेल्या नसतात. पूर्ण पक्व झाल्यानंतर शेंगाची दोन्ही टरफले वेगळी होऊन आतील बिया वाऱ्यासोबत विखूरल्या जातात. त्यांचा प्रवास जास्त अंतराचा व्हावा याकरिता या बियांच्या एका टोकाला पंखासारखा पातळ पापुद्रा असतो. त्यामुळे वाऱ्याच्या झोतासह त्या लांबवर विखूरल्या जातात.

या झाडाच्या पानांचा, बियांचा, सालीचा तसेच मुळांचा विविध औषधांसाठी उपयोग होतो. ताप, पोटदुखी, त्वचा रोग विशेषतः सोलॉरसीस, डोक्यामधील कोंडा यावर उपचारासाठी उपयोग होतो. याशिवाय पाने, फुले व सालीपासून जो अर्क काढला जातो त्यावर प्रक्रीया करून विविध आजारांवर औषधे तयार केली जातात. याच्या औषधी गुणांवर अजूनही संशोधन चालू असून खूप चांगले परिणाम हाती आले आहेत. आयुर्वेदामध्ये इतर औषधांसोबत देखील या झाडाच्या पानांचा तथा सालीच्या अर्काचा उपयोग करतात. याच्या पानांपासून निळा रंग तयार करता येतो. त्यामुळेच त्याला Pala Indigo हे नाव पडले आहे.

असे हे बहुगुणी झाड जंगलात, शेतात, रस्त्याच्या कडेला अन् कधी गावात देखील आढळते. याची कसलीही मिजास नाही. एकदा रुजले की ऊन, वारा, पाऊस यापासून स्वतःचा बचाव करीत अनेक वर्षे तग धरून राहते. याचे लाकूड विविध कलाकुसरीच्या वस्तू करण्यासाठी वापरतात. पूर्वी पानांचा पत्रावळी करण्यासाठी उपयोग व्हायचा. ग्रामीण भागात अजूनही ही पद्धत टिकून आहे. याच्या फुलांची भाजी करतात. ग्रामीण भागात आठवडा बाजारात चक्कर मारली तर ही फुलं विक्रीला ठेवलेली आढळतात. जंगलाच्या सानिध्यात राहणारे आदिवासी हे जंगलातील अशा विविध भाज्यांचा, फळांचा त्यांच्या रोजच्या आहारात वापर करतात. आदिवासी मुळात मितभाषी असतात. पण त्यांना बोलते करण्यात तुम्हाला यश मिळाले तर त्यांच्याकडून अशी अनेक गुपिते माहीत होऊ शकतात. कारण त्यांचा निसर्गाशी अधिक जवळचा संबंध आहे. पूर्वी पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असणारा हा समाज अजूनही निसर्गाशी आपली नाळ टिकवून आहे. शहरी माणसाला त्यांच्याकडून खूप काही शिकता येईल.


**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी – ९८६९५४१९६६

भरलेला खिसा माणसाला दुनिया दाखवतो, रिकामा खिसा मात्र दुनियेतील माणसं दाखवतो.

# मनोज बोरगावकर यांची 'नदीष्ट' कादंबरी

*मनोज बोरगावकर यांच्या 'नदीष्ट' कादंबरीचे परीक्षण या लेखात विशद केले आहे - संपादक*

मनोज बोरगावकर यांची 'नदीष्ट' ही १६७ पानांची कादंबरी एका दिवसात वाचून संपवली. नदीप्रमाणेच अत्यंत प्रवाही लिखाण असलेली नदीष्ट ही कादंबरी निसर्गाशी संवाद साधण्याचा प्रयत्न तर करतेच, पण मानवी मनाची सल वेगवेगळ्या पात्रांच्या माध्यमातून आपल्या समोर उलगडून दाखवते. म्हटलं तर प्रत्येकाचं आयुष्य एक चित्रपट असतं. आपण लहानाचे मोठे होतो, प्रत्येक जण जगताना एक वेगळंच भावविश्व मनात जपत जगत असतो आणि म्हणूनच प्रत्येकाच्या जगण्याला वेगळं परिमाण प्राप्त होत असतं. मनोज बोरगावकर नदीकाठी त्यांना भेटलेल्या व्यक्तींच्या आयुष्याच्या कथा समजावून घेत आपल्यासमोर ह्या पुस्तकाच्या माध्यमातून ठेवतात. एक कोलाज पूर्ण होतं. ह्या कोलाजातल्या कथा आपल्याला अंतर्मुख करतात, हतबल करतात. निसर्ग आणि माणूस यांच्यात निर्माण होत चाललेली दरी या कादंबरीने पुन्हा बुजवण्याचा प्रयत्न ही कादंबरी करेल असा विश्वास वाटतो. कारण ही कादंबरी पूर्वी म्हटल्याप्रमाणे एक चित्रपट वाटते, प्रवाही वाटते. प्रसंगी ती आपला आरसा होते.




नदीष्ट ही कादंबरी म्हणजे मनोज बोरगावकर यांच्या त्यांना लागलेल्या पोहायच्या नादाची जंत्रीसुद्धा आहे. १० वर्षांचा पोहण्याचा सराव असलेले बोरगावकर गोदावरीचा त्यांच्या परिसरातला किनारा नेहमी पोहून पार करतात. त्यांना हा लागलेला नाद इतका विलक्षण आहे की, फक्त पाणी आटल्यानंतर त्यांचा खाडा होतो अन्यथा पुरातसुद्धा ते नदीत पोहतात. हे सगळं उलगडवताना थ्रीलिंग एक्सपिरियन्स आल्याशिवाय राहात नाही.

रुमीच्या When you do things from your soul, you feel a river moving in you, a joy ह्या कोटेशनने सुरू झालेल्या ह्या कादंबरीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती अलंकारिक भाषेच्या मर्यादा ओलांडून खूप संवादी होते. अनेक हिंदी, उर्दू , इंग्लिश शब्दांचा चपखल वापर यात दिसून येतो.

माकड हे आपले वंशज. नदीकिनारी माकडांची टोळी ज्या निर्दयतेने हरणाच्या पाडसाला उचलून नेते व संपवते त्याचे वर्णन लेखक करतो आणि ते करत असताना आपण माकडाचे वंशज आहोत या त्याला न पटलेल्या डार्विनच्या सिद्धांताला पटवून घेतो. आपलं हिंस्र होतं जाणं, संवेदनाहीन होतं जाणं, ओरबाडणं, लुटणं, लुबाडणं मग ते निसर्गाला असो की आपलंच आपल्याला; हे सगळं अधोरेखित होतं.

---

तुम्ही गरीब म्हणून जन्माला आलात यात तुमचा काहीच दोष नाही; पण जर तुम्ही गरीब म्हणून मेलात तर हा नक्कीच तुमचा दोष असेल!

बोरगावकरांची हे सगळं सांगण्याची पद्धत अत्यंत सोपी आणि कथेच्या अंगाने जाणारी आहे. ते बिलकुल पुस्तकी होत नाहीत. अनेक प्रसंगात पौराणिक प्रसंगांच्या वा जुन्या ऐकलेल्या कथांचा संदर्भ पेरत ते आपली स्वतःची कथा समृद्ध करताना दिसतात.

नदीवर पोहायला शिकवणारे दादाराव हे, 'नदी एकट्याने पार करत जाऊ नकोस' असे जेव्हा काळजीच्या सुरात म्हणतात तेव्हा ती 'माणूसपण' टिकून असल्याची निशाणी असते. हे माणूसपण उलगडत जातं ते लेखक नदीवर पोहायला जाताना नदीवर येणाऱ्या इतर पात्रांच्या रूपाने. लेखक स्वतःला नदीचं असणारं आकर्षण उलगडू बघतो. ते म्हणतात की, 'आईच्या गर्भात नाही का आपण निर्धोक ९ महिने ९ दिवस गर्भाशयातल्या पाण्यात राहिलो! ही नदीदेखील आईच'. या आकर्षणाचा आणखी एक कंगोरा म्हणजे लेखकाच्या आईला याच नदीच्या घाटावर दहन केलेलं. मनोज बोरगावकर नदीशी आपलं असणारं नातं सांगून टाकतात. त्यांना विश्वास आहे की, जसे आई बाळाला कुशीत घेते तशीच ही नदी त्यांना कुशीत घेते.

कादंबरीत साकीनाबी नावाचं पात्र समोर येतं. लेखकाशी तिची ओळख होते काय आणि नंतर काहीच दिवसात रेल्वेखाली तिचे पाय जाऊन नंतर ती मरते काय, सगळंच अघटित. पूर्ण कादंबरीभर असाच शोकांत समोर येत जातो. कादंबरी बेचैन करत राहते.

झिंगाभोई बामणवाड असाच नदीवर मासे पकडायला येणारा. त्याच्याशी लेखकाचा झालेला घरोबा आणि अनेक दिवस झिंगाभोई नदीवर फिरकला नाही म्हणून लेखक चिंतेत पडतो आणि एक दिवस तो दिसल्यावर त्याच्याकडून विपरीत ऐकायला मिळतं. नदीवर एक बाई, 'आपला नवरा दारू सोडून देईल तर नदीवर अंघोळीला येईन' असा नवस बोललेली असते आणि तो नवस फेडायला नदीवर येते आणि तिच्यावर तिथे असणारी टुकार पोरं बलात्कार करतात. त्या बाईला ती मुलं झाडीत घेऊन जातात झिंगाभोई बामणवाडच्या देखत! आणि तो जिवाच्या भीतीने काहीच करू शकत नाही याचं शल्य त्याला आहे. तो स्वतःच्याच नजरेतून उतरला आहे. लेखक मानवी मनाची विविध रूपं इथे उलगडतो. माणसाचं हिंस्र बलात्कारी असणं, मग ते वेगवेगळ्या रूपाने.. तो ते अधोरेखित करतो..

लेखकाला नदीकाठी त्याची पोहताना काळजी करणारा कालूभैय्या, तसेच मंदिराचा पुजारी ही पात्रं आपली वाटतात. पण त्याचबरोबर तो माणसाला माणूस आपला वाटू नये, आपलीच आपल्याला लाज वाटावी असे प्रसंग इतर पात्रांच्या माध्यमातून डोळ्यांसमोर आणतो.

मोरांच्या थव्याचं नदीकिनारी उडतानाचं विहंगम दृश्य लेखक वाचकांना आपल्या चष्म्यातून दाखवतो, तर कालूभैय्याच्या म्हशीचं जगणं आणि त्याचदरम्यान सुरू असणारा पाऊस हे देखील दृश्य आपल्याला दाखवत आपल्याला ताजंतवानं ठेवतो. अशा प्रसंगांमुळे कादंबरी ताजी वाटत राहते.

कादंबरीत दोन महत्त्वाची पात्रं येतात ती म्हणजे सगुणा आणि भिकाजी. सगुणा ही हिजडा असते, तर भिकाजी हा भिकारी. ह्या दोघांशी लेखकाची गाठ पडते नदीकिनारी. ही दोन पात्रं वेगवेगळ्या वेळी लेखकाला भेटतात. पण त्यांचं आयुष्य त्याच्यापुढे उलगडताना मानवी मनाचे, जगण्याचे, असण्याचे, नसण्याचे अनेक पदर समोर येतात.

सगुणा हिजडा कशी झाली? बिरादरीत तिला कसं घेतलं? त्यांचे कोडवर्ड्स काय? हे मी इथे लिहिणार नाही. ते सगळं वाचण्यासाठी आहे. हिजड्यांचं जगणं कायम दुर्लक्षित झालंय, त्यांना समाजात कायम हिनपणे वागवलं गेलं. सगुणा हे पात्र हिजड्यांचं दुःख, त्यांच्या वेदना आपणासमोर आणते व एक जीव म्हणून त्यांचा आपण आदर करावा ह्या विचारात आपल्याला सोडून देते.

सगुणा लेखकाला भेटते तेव्हा त्याला 'जान' म्हणते. ती लेखकाला भेटताना लेखकाला समाजाकडून कुठलाही त्रास होणार नाही याची खबरदारी घेत भेटते. काळजी घेते. तिचं सहृदय समोर येतं. 'फिर मिलेंगे' म्हणणारी सगुणा दुसऱ्या राज्यात जायला निघते तेव्हा 'अलविदा' म्हणत निघून जाते, लेखकाला मिठी मारते, इथे माणुसकीचे झरे पाझरताना आपलेदेखील डोळ्यांचे झरे वाहायला लागतात.

भिकाजी असाच एका वेड्याक्षणी वाईट प्रसंगातून बनलेला भिकारी. त्याच्या बहिणीला मांजरीचं वेड. बहिणीला आई नेहमी म्हणते 'वांझ होशील पोरी'. बहीण मोठेपणी वांझ होतेच. तिचा छळ होतो. एक दिवस ती आत्महत्या करते. भिकाजी लग्न करतो खरा पण बायकोच्या वैतागाला कंटाळून दारूच्या आहारी जातो. एका रात्री नशेत झोपलेला असताना त्याला वाटतं की आपल्या मांडीपाशी मांजर घुटमळतंय. ती असते त्याची एक वर्षाची मुलगी. मांजरीवरती खुन्नस म्हणून तो रात्री नशेत मांजर समजून स्वतःच्या मुलीला फेकून देतो. मुलगी मरते. भिकाजी कोर्टात काहीच न बोलता शिक्षा स्वीकारतो. नंतर भिकारी होतो. निःसंग होतो इतका की; कुणाशीच न बोलणारा भिकाजी स्वतःची भाषा विसरून गेला की काय असे वाटावे.

सगुणा काय किंवा भिकाजी काय ही परिस्थितीने गांजलेली पात्र आपल्या अवतीभोवती वावरतात तेव्हा त्यांच्या आत 'माणूसपण' असतं ते आपण बघतच नाही. आपण त्यांना जनावरांची वागणूक देतो. आपण माणूस असतो का? की आपणही जनावरच? सगुणाला लेखक सुरुवातीला ती हिजडा असल्याने घाबरतो तेव्हा सगुणा थेट प्रश्न करते, 'तू मला घाबरला की मी तुला?' लेखक घाबरलेला असतो म्हणून ती दुसरा प्रश्न टाकते आणि म्हणते, 'मग हिजडा कोण?'

आपलं जगणं, इतरांना वागवणं लेखक ह्या कादंबरीच्या माध्यमातून आपल्यासमोर आरसा बनून दाखवून देतो... अनेक कंगोऱ्यांनी नटलेली ही कादंबरी खूप सुंदर आहे.. नक्की वाचा.

**– श्रीपाद अरुण जोशी**
सहाय्यक प्राध्यापक
क्लारास कॉलेज ऑफ कॉमर्स,
भ्रमणध्वनी – ९७३०७३०२२२

●●●

(पृष्ठ क्र. ४ वरून - **कॅक्स्टन सभागृह, लंडन**)



**कॅक्स्टन हॉल पुढे भारतीय चमू**

यावर्षी देखील इंग्लंड सहलीत या सभागृहाला भेट देण्याचा विचार होता. परंतु करोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे विदेश प्रवासावर बंधने घालण्यात आली. त्यामुळे नाईलाजाने यावर्षीची सहल रद्द करावी लागली. सर्व सुरळीत होताच सहल आयोजनाचा विचार पुन्हा केला जाणार आहे. तेव्हा अर्थातच या सभागृहाला भेट देण्याची संधी मिळेल.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे – ४२१२०४

●●●

# महाराष्ट्राची शान - लोकनृत्यांचा अविष्कार

*महाराष्ट्राची शान असलेल्या लोकनृत्यांचा आढावा या लेखात घेतला आहे - संपादक*

महाराष्ट्र ही लोककलावंतांची भूमी आहे. लोकांनी लोकांसाठी सादर केलेली कला म्हणजे लोककला. आता हा शब्दप्रयोग अनेक अर्थांनी आढळून येतो. नृत्य, नाट्य, गायन, वादन, विणकाम, चित्रकला, शिल्पकला इत्यादी स्वरूपाच्या कला. या लोकसमूहाच्या कला, तर लोकसंस्कृतीच्या उपासकांचे कलाविष्कार म्हणजे गोंधळ, वाघे, नंदीबैलवाले, पोतराज, भुते, वासुदेव, चित्रपती, बहुरूपी मध्ये पोवाडा, तमाशा, भारूड, नमन, खेळे दशावतारी इत्यादी प्रकार मोडतात. या विविध अर्थाने लोककला हा शब्दप्रयोग केला जात असला तरी एक गोष्ट निदर्शनात येते, ती म्हणजे या सर्व कला पारंपरिक आहेत. त्यांचा लोकजीवन प्रवाहाशी संबंध आहे.

सभोवतालचा निसर्ग, प्राणी, पक्षी यांच्या अनुकरणातून लोकसंगीत, लोककला, लोकनृत्य यांची निर्मिती होत गेली. नदीच्या खळखळ वाहण्यातून, वाऱ्याच्या झोळीतून, पानाच्या सळसळीतून नाद येतो. लोकसंगीताला सूर, ताल, लय यांचे योगदान मिळालं. तर पक्षी व इतर प्राणी यांच्या हालचालींतून निसर्गाशी असलेल्या अद्वैत रूपाने लोकनृत्यांचे पदन्यास घडत गेले.

लोकनृत्याचा आत्मा समजायला हवा. कलात्मकता साधण्याचा सहेतुक प्रयत्न लोकनृत्यात नसतो. ही नृत्ये लोकांमध्ये वंशपरंपरागत चालत आलेली असतात. त्यांना रीतसर नृत्य प्रशिक्षण व नृत्य शिक्षक यांची आवश्यकता नसते. त्यांना बंदिस्त रंगमंचही नसतो. ती खुल्या जागी केली जातात. भारतातील आदिवासी जमातीतील आणि ग्रामीण जीवनातील नृत्येही साधारणपणे लोकनृत्ये म्हणून ओळखली जातात. लोककलेचा प्रमुख गुणधर्म हा की, तिच्यात व्यक्तीपेक्षा सामूहिक अभिव्यक्ती अधिक प्रभावी असते. एकाच व्यक्तीचा व्यक्तीभाव हा पूर्णपणे लोप झालेला असतो. आणि ती केवळ उत्स्फूर्त असते. जन्मजन्मांच्या आंतरिक चैतन्याचा तो सरळ साक्षात आविष्कार असतो. लोकनृत्याच्या बाबतीत हे अन्य कलांपेक्षा अधिकांशाने खरे आहे. कारण मानवी प्रकृतीमध्ये धर्म-विधीची आंतरिक गरज जशी स्वाभाविकपणे असते. तद्वतच तिची लयबद्ध ओढ ही त्याला खेचून घेत असते आणि यातून लोकनृत्य एकप्रकारे धर्मविधी रूपाने प्रकट होताना दिसतात. आदिवासी नृत्यां बाबत हे विशेष खरे आहे. साधेपणा हा लोकनृत्याचा आत्मा समजायला हवा. कलात्मकता साधण्याचा प्रयत्न लोकनृत्यात नसतो. ही नृत्यं लोकांमध्ये वंशपरंपरागत चालत आलेली असतात. त्यांना रीतसर नृत्य प्रशिक्षण व नृत्य शिक्षक यांची आवश्यकता नसते. त्यांना बंदिस्त रंगमंचही नसतो. ती खुल्या जागी केली जातात. लोकनृत्यात भाग घेणारे स्वराज्यनार्थ भाग घेतात. त्यात कला-प्रदर्शनाचा व प्रेक्षकांच्या रंजनाचा हेतू नसतो. त्यामुळे एखाद्या नर्तकाची व्यक्तीगत सौंदर्यपूर्ण अभिव्यक्ती व एखाद्या विशिष्ट सुट्ट्या मृत्यू अवस्थेची तांत्रिक गुणवत्ता यांना अभिजात नृत्यात असणारे प्राधान्य येथे लोकनृत्यात नसते. तर लोक माणसातून उसळणाऱ्या चैतन्याचा सर्वसमावेशक परिणाम आणि त्याच्या अविष्कारातील पूर्तता, तिखटपणा आणि

साधेपणा यांना महत्त्व असते. सर्वसामान्य अर्थाने प्रेक्षक हा घटक येथे गृहीत धरलेला नसतो आणि नृत्य पाहण्यासाठी जे भोवती जमलेले लोक असतात ते नर्तका प्रमाणेच त्या ही आत्मविष्काराचा भाग असतात. भारतीय लोकनृत्यांमध्ये बाह्य जेवणाच्या हालचाली व आंतरिक लय यांचा सुरेख मेळ साधलेला दिसून येतो. पशु-पक्ष्यांच्या हालचाली, पानाफुलांचे आकार, विभ्रम यांची मनोज्ञ नृत्ये त्यात आढळतात. फांद्या झुलाव यात त्यानुसार नर्तकांच्या हातापायांची हालचालींमध्ये लय साधली जाते. गवत वाऱ्यावर डोलते तसेच नर्तकाचे शरीरही तालावर डोलत असते. लोकनृत्यातून निसर्गाचे व पशु-पक्ष्यांच्या हालचालींचे जसे अनुकरण साधले जाते, तद्वतच जनजीवनातील दैनंदिन स्त्रियाही नृत्यरूपाने साकार होताना दिसतात.

थाट मराठमोळ्या नृत्यांची लावणी-लावणी नृत्य प्रकारातून अनेक विषय मांडले जातात. पूर्वीच्याकाळी यातून संतांच्या गोष्टी सांगितल्या जात. अनेक सामाजिक विषय धर्म-राजकारण, शृंगार, प्रेम असे विषयही लोकांसमोर सादर केले जात. या नृत्य प्रकारातील हालचाली मोहक व मादक असतात. हे नृत्य स्त्रिया करतात आणि त्यांना साथ करायला ढोलकी वादक, पेटी वादक व तुणतूणे वाजविणारा असे पुरुष वादक असतात. तसेच बाईच्या आवाजात बोलणारा एक पुरुषही असतो ज्याला 'नाच्या' असे म्हणतात. अठराव्या व एकोणिसाव्या शतकामध्ये लावणीचा दर्जा खूप खालावला होता. केवळ करमणूक म्हणून त्याकडे पाहिले जायचे. पण आज पुन्हा एकदा लावणीला तिचे स्थान मिळाले असून भारतातच नव्हे तर जगभर या नृत्यप्रकाराचे कार्यक्रम केले जातात.

### कोळी नृत्य

सागर किनारा हे महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य. त्यामुळे कोळी लोकांचे प्राबल्य जास्त आहे. होडीत बसून मासेमारी करण्यासाठी समुद्रात लांबवर जाणारे हे कोळी लोक आनंद व्यक्त करण्यासाठी नृत्य करतात. स्त्रिया व पुरुष असे दोन गट यात असतात. पुरुष हातात वल्हे व स्त्रिया हातात टोपली घेऊन नाच करतात. अनेक वेळा हा नृत्यप्रकार समुद्र देवतेला प्रसन्न करण्यासाठी केला जातो. अधिक मासोळ्या मिळाव्यात अशी प्रार्थना केली जाते. या नृत्याच्या हालचाली डौलदार आकर्षक उत्स्फूर्त असतात. तसेच हालचालींमुळे बघणाऱ्यांच्या डोळ्याचे पारणे फिटते. हातापायांच्या हालचालीतून नौका चालविण्याचा, मासे पकडण्याचा, समुद्राच्या लाटांचा आभास होतो.

### धनगरी नृत्य

सातारा, सांगली, कोल्हापूर या भागात धनगरांच्या वस्त्या शेकडो वर्षे वस्ती करून राहिल्या आहेत. हे धनगर लोक म्हणजे मेंढपाळ करणारे भोंगळ्या विकणारे. हा त्यांचा मुख्य व्यवसाय. पूर्वी एकदा मेंढरे व शेळ्यांचे कळप वारुळातून निघाले व शेतीची नासधूस लगेच करू लागले तेव्हा लोकांनी महादेवाची प्रार्थना केल्याने त्याने धनगर लोक निर्माण केले. अशी धनगर लोकांच्या उत्पत्तीची कथा आहे. हे लोक मूळचे द्रविड असून स्वतः नाते यादव वंशी समजतात.

खुल्या आकाशाखाली लवणारे, शेकोटी, गजानन ढोला चादन पण बसका आवाज ऐकायचा या वाद्यांचा अंगात गोमना रानात या दोन्ही गालांवर गजा नृत्य सुरू होते. गजर म्हणजे हत्ती त्याच्यासारखे संत व दिमाखदार हे नृत्य चालते आणि हळूहळू त्याची लय वाढत जाते नृत्य करणारे गायकालाचा मोहित आवाज देत असतात. गजा ढोलकर वेताळ वाजवणारा आणि नृत्य करणारे नर्तक एकमेकांना छेद देत नृत्य करतात. स्वतःभोवती फिरत बैठका झालं हातातले रंगीत क्रमांक उडवत बिरोबाच्या नावानं चांगभलं अशा आरोळ्या ठोकत असतात. या नृत्यात फक्त पुरुष मंडळीच भाग घेतात.

रात्रभर जागरण करायचे असल्यामुळे गाण्याच्या रूपात मोठी सुंदर अद्भुत आणि चित्ताकर्षक गीत कथा घोळवून गात धरती मातेचे अंगण सजीवन करून सोडतात. गजी ढोल नृत्य करताना प्रथम गणा म्हणतात. त्यात कुलदैवता बरोबर मातृभूमीचे आणि जन्मदात्याचे स्मरण केले जाते. त्यावेळी महाभारतातील किंवा रामायणातील कथा लावतात. नंतर आरती होते त्याबरोबर ओव्या ही असतात. देवाकडे साकडे घातले जाते. त्यावेळी ढोल-ताशाचा गजर होतो आणि शेवटी प्रसाद वाटला जातो. महाराष्ट्रातील धनगर समाजात अनेक प्रकारचे विधी करण्याची प्रथा आहे त्यातला होईल हा एक महत्त्वाचा विधी मांडला जातो. होईल म्हणजे धनगराचे भविष्य कथन करणारा दिवस. या दिवशी भगत पुढील काही महिने पाऊस कसा पडेल, कुठल्या ठिकाणी चांगले गवत उगवेल हे सांकेतिक भाषेत सांगतो. त्याच्या म्हणण्यानुसार धनगर हा आपल्या समुहा बरोबर त्या दिशेला निघतो. होईलकाच्या आदल्या रात्री नृत्य ओव्या जोशात असतात. त्याला वाळू म्हणतात. भगत निरनिराळ्या देवतांना विकास येण्याचे आवाहन करतो.

व्हैकाला येवावं, तुवा व्हैकाला येवावं
जेजुरीच्या देवा तुवा व्हैकाला येवावं
लल्लाटी भंडारा लेवावा,
तुवा व्हैकाला येवावं.....

धनगर जमातीतील लोक निसर्गावर आधारित काव्य बनवतात व त्यावर नृत्य करतात. देवांचा आशीर्वाद घेण्यासाठी या नृत्यातून प्रार्थना करतात. पुरुष मुख्यत्वेकरून हे नृत्य करतात. धोतर, फेटा, अंगरखा, भडक रंगाचा रुमाल असा त्यांचा पोशाख असतो. त्यांच्या काव्याला ओवी म्हणतात. धनगरी ओव्या प्रसिद्ध आहेत. नृत्य करताना सर्वजण घोळका करतात व मध्ये ढोलवादक असतो.

**तमाशा**

तमाशा हा एक महाराष्ट्रात सोळाव्या शतकातला नृत्य नाटकाचा प्रकार आहे. यामध्ये काव्य, नृत्य, नाट्य व संगीत वादन यांचा समावेश आहे. पूर्वीच्याकाळी तमाशातून रामायण व महाभारतातील गोष्ट सादर करून लोकांचे ज्ञान वाढविण्याचा उद्देश साधला जात होता. बदलत्या काळानुसार लावणीच्या माध्यमातून शृंगारिक कथा सादरीकरण होऊ लागलं. तमाशा मध्ये वाजवली जाणारी वाट म्हणजे ढोलकी. तुने मंजीरा कडे हलगी लेझीम पेटी आणि अर्थातच नर्तिका त्यांच्या पायातील घुंगरू. तमाशाचे विविध प्रकार म्हणजे पोवाडा, दशावतार व गवळण रंगमंचाची आवश्यकता असतेच असं नाही. गावातील चौकात घराच्या अंगणात किंवा मैदानामध्ये हा नृत्यनाट्य प्रकार सादर होऊ शकतो. मधल्या काळात तमाशाचं महत्त्व का लावलं कारण त्यातून फक्त अश्लील विषय मांडले जाऊ लागले होते. लावणीच्या फक्त मादक हालचाली करून लोकांची करमणूक केली जायची. परंतु आजच्या जाणकार समाजाच्या गरजा बघता तमाशाने पुन्हा एकदा आपल्या सामाजिक ध्येयाकडे वाटचाल सुरू केलेली आहे.

**नमनखेळे**

नमन खेळे हा कोकणातील लोक नृत्य प्रकार आहे. सतराशे २८ मध्ये श्यामजी नाईक काळे व शिवराम नाईक गोडबोले या दोन कीर्तनकारांनी कर्नाटकातून जो लोककला प्रकार महाराष्ट्रात आणला त्याचे दोन भाग होऊन एक दशावतार म्हणून दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यात व मन खेळे उत्तर रत्नागिरी जिल्ह्यात प्रसिद्ध पावला. कोकणवासीयांसाठी शिमग्याचा उत्सव ही पर्वणी असते. त्या सणासाठी ग्रामदैवताच्या पालख्या आणि त्यासोबत नाचणारे खेळ हे चित्र हटकून पहावयास मिळते गावानुसार खेळांचे नानाविध प्रकार आहेत. त्यात मुख्य असतात शंकासूर व राधाकृष्ण नृत्याच्या हालचाली पण आकर्षक असतात कोकणात आणखी एक नवीन नृत्य उदयास येत आहे ते म्हणजे पालखी नृत्य. ग्रामदेवतेची पालखी नाचवणे असे याचे स्वरूप आहे.

## कुपारी नृत्य

ठाणे जिल्ह्यातील वसई हिरव्यागार उत्तर किनारपट्टीत सामवेदी समाज पूर्वापार वास्तव्य करत आहे. सामवेदी समाज म्हणजेच खूप भारी समाज. मुंबईसाठी तो भाजी विकणारा, दूध भरणारा म्हणून प्रसिद्ध आहे आपल्या मातीवर ते जिवापाड प्रेम करणारा हा सामवेदी समाज आपल्या बोलीभाषेवरही तितकच प्रेम करतो. सुमारे पन्नास हजारांच्या वर ग्रामीण लोकांची ही बोलीभाषा असूनही भागाशी पासून ते भुईगाव पर्यंतच्या बारा गावच्या देशी शतकानुशतके जोडलेली आहे. ही बोलीभाषा खडबडीत व क्लिष्ट वाटत असली तरी ती वैशिष्ट्यपूर्ण आगळेवेगळे नावीन्यपूर्ण आणि भावमधुर आहे. वसई करांची कुपारी नृत्य ही खूप प्रिय व प्रचलित नृत्ये आहेत. या नृत्यात स्थानासाठी या वाद्याचा वापर केला जातो. घुमट हे वाद्य मूळचे दक्षिण आफ्रिकेतील असून पोर्तुगीजांनी वसईला आणले आणि आज वसईत प्रत्येक लग्न व इतर आनंदाच्या प्रसंगी या वाद्याचा सर्रासपणे वापर केला जातो.

## लेझीम नृत्य

'तो पडतो का पडतो' अशी हलगी वाजायला लागली की गावातील तरुण मुले लेझीम घेऊन मारुतीच्या देवळात समोर जमतात आणि मराठी मुलखातील मराठा गाड्यांचा पुरुषार्थ दाखविणारे पारंपरिक खेळ रुपी जोमदार लेझीम नृत्य सुरू होते. प्रामुख्याने पुणे, सातारा, कराड, कोल्हापूर आदी भागात हे लेझीम नृत्य प्रचलित आहे. लेझीम मध्ये दीड हात व्यासाचे खडक वाजणारे खाजगी रणवाद्य सारखी असते. सोबत मोठे झाड कैसा या प्रमुख वाद याबरोबर मोठ्या ढोलाचाही उपयोग केला जातो. फळांच्या अनेक तात्या लोखंडे चाळीत गुंतवून त्या एका दांड्यावर बसवून केलेला अनेक लेझीम एकाच वेळी वाजू लागले की वाद्ये आणि लेझीम यांचा एक सूर एक लय तयार होते. चार कलाकारांपासून ते ४० कलाकारांपर्यंत लेझीम किंवा त्यापेक्षा जास्त कलाकार लेझीम नृत्यात सहभागी होऊ शकतात. सुरुवातीला दोन दोन किंवा चार चार रांगांमध्ये उभे राहून हळूहळू ठेका धरत नाद सुरू होतो. शेवटी अगदी जलद गतीने लेझीमच्या कसरती करत सांगतो लेझीम मध्ये मोर्चाला द सपना उडानची बैठक आगे चल बैठक त्याला मी असे वेगवेगळे २७ ते २८ प्रकार असतात लेझीम खेळ देव देवतांच्या पालख्या जत्रा उत्सव लग्नाची वरात विजयी उमेदवारांची मिरवणूक याप्रसंगी खेळला जातो.

## भिमरा नृत्य

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील कोपरी गाव या ठिकाणी भिमरा नृत्य केले जाते मराठा जातीचे गुराखी लोक पावसाळ्यातील भात शेतीचे सर्व कामे संपल्यावर ते आपल्या मुलांना रानावनात करायला घेऊन जातात गोरे रानात चरत असतात आणि गुराख्याची गोड बासरी रानात व्हायला लागते. सूर ऐकून त्याचे सोबती जमा होतात आणि त्यांचं भीमराव नृत्य सुरू होते. या नृत्यात संख्येची मर्यादा नसते. हे नृत्य फक्त पुरुषच करतात. त्याला साठी ढोलकीच्या आकाराचे डोळ्यात असते आहे नाचणार यांच्या पायात घुंगरू असतात ढोलकी वाजवणारा आणि जाणारा मुख्य गायक मध्ये बसतो आणि त्याच्या भोवती गोल फेर धरून नृत्य करणारे गाण्याला साथ देत नसतात साधारणपणे जाखडी नृत्याची त्यात झलक दिसते परंतु त्यांच्या गाण्याच्या चाली आणि नृत्याची हालचाल फार वेगळी असते या मृत त्याची वेशभूषा अत्यंत साधी असते म्हणजे कमरेला कपडा गुंडाळतात अंगाने उघडे आणि डोक्याला फडके बांधलेले असते बासरी ढोलक इतकीच त्यांची माफक वादे भीमराव नृत्याची गाणी महाभारत रामायणावर आधारित असतात वंचित एखाद-दुसरे सामाजिक गीतही गायलं जातं सुरुवातीला संथ आणि काही वेळाने नृत्याला जलद गती प्राप्त होते आणि काही वेळाने गाण्याच्या

ध्रुवपद आवर कोणी हा संथ गतीत नृत्य होतं अशा प्रकारे चढ-उतार होत होत नृत्यात एखादी कथा ही गाण्यातून समोर येते.

### जाकडी नृत्य

जाखडी लोकनृत्य हे कोकणच्या संस्कृतीला लाभलेले फार मोठे वरदान असून याचे मूळ संस्कृत मध्ये आढळते कोकणातील कुणबी समाजाचे ही पारंपरिक कला जाकडी नृत्य वर्षानुवर्षे या श्रमजीवी शेतकऱ्यांनी जोपासली आहे. ही कला एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्द केली जात आहे. प्रत्येक ठिकाणच्या लोकांचा वेगळा प्रकार असतो. कोकणातील बरीच मंडळी कामधंद्यासाठी मुंबईत आले. गौरी-गणपतीला हमखास एकत्र येतात आपल्या दैवतावर गाणे रक्तात गातात नाचतात त्यात काम करणारे बाल्यावस्थेतील मुले म्हणून त्याला बाल्या नृत्य असेही म्हणतात. गाणारे वाजविणारे अंडी घालतात. नाचणारे उघडे मात्र गळ्यात शेला व हातात मोठा रुमाल एका कानात दुल डाव्या पायात घुंगरू वाद्यांमध्ये मृदुंग मोठे भजनी टाळ गणा सवाल-जवाब इतर गाणी असे जाखडी नृत्य रंगते नृत्याची सुरुवात प्रथम स्थानाला नारळ अर्पण केला जातो आणि नंतर गणेश वंदनेने होते त्यानंतर गण गवळण एखादे पद असते आणि पारंपरिक गीत जाणारा पायात चाळ बांधून ढोलकी आणि धान यांच्या लई वार वर्तुळाकार उभे राहून किंवा बसून हालचाली करत आठ ते दहा जणांचा संच हे पारंपरिक नृत्य करतात त्यासाठी गावातील वाड्यांवर जाखडी कला पथके स्थापन केली जातात.

पेण पनवेल महाड या भागातील शक्ती डोळ्याचे जुगलबंदीचे सामने सादर होतात. यानात पथकाचे शक्ती आणि तुरा असे दोन भाग पडतात. तुरा हे शंकराचे प्रत्येक तर शक्ती हे पार्वतीचे प्रतीक शक्ती म्हणजे स्त्री आणि तुरा म्हणजे पुरुष त्यामुळे शक्ती श्रेष्ठ हे सनातन युद्ध म्हणजे शक्ती तुराचे सामने तुरेवाले डोक्याला मोराचे पीस लावतात तर शक्ती वाल्यांच्या डोक्याला फेटा असतो ना होताना तुरेवाले आणि शक्तीवाले यांच्यात सवाल-जवाब आबांची खडाजंगी होते शक्ती वाल्याने चोरे वाल्यांना सवाल विचारायचा त्याचे उत्तर तुरे वाल्याने द्यायचे नंतर चोरे वाल्यांनी शक्ती वाल्यांना सवाल विचारायचा त्याचे उत्तर शक्ती वाल्यांनी त्यांना द्यायचे वेदर पुराणावर आधारित प्रश्न आणि त्यांची उत्तरे असा झगडा सुरू होतो गणेश पुराण रामायण महाभारत संत कथा नवनाथांच्या कथा हरिविजय भक्तिविजय यांतील कठीण प्रश्नांचा स्पर्धक वापर करतात त्याची उत्तरे प्रतिस्पर्ध्याला आले नाहीत तर प्रश्न करता स्वतः त्यांची उत्तरे देतो वेद पुराणातील प्रश्नांबरोबर स्वतंत्र वीर कथा लोकसंख्या आरोग्य दारूबंदी यांसारखे सामाजिक विषयांवर येईल प्रश्न सवाल-जबाब आत रंगत जातात मूलतत्त्व आधी तत्त्व आणि तत्त्वांची उत्पत्ती हे या जाखडी नृत्याचे मूळ विषय असल्यामुळे शृंगारिक गाणी आणि संवादाला अजिबात येथे नसते.

### गोफ नृत्य

विदर्भ नागपुरात गोपाळ नृत्य फार लोकप्रिय आहे परंतु या नृत्याची परंपरा भारतात सगळ्या ठिकाणी प्रचलित आहे प्रत्येक प्रांत आपले एखादे नृत्य व प्रकारात सादर करतो गोफण व त्यासाठी रंगीबेरंगी लांब कपड्याचे तुकडे हाताच्या एखाद्या टोकाला किंवा उघड्यावर दहीहंडी प्रमाणे बांधून ते मोकळे खाली सोडले जातात व त्यात भाग घेणारे कलावंत एकेक तुकडा हाताला बांधून टिपऱ्या वाजवत गोलाकार अशा रीतीने फिरतात की या रंगीबेरंगी कापडी पट त्यांना वरच्या बाजूने पडत जातो व हळूहळू त्याला दोरखंडाला सारखे स्वरूप प्राप्त होते त्यानंतर पुन्हा विरुद्ध दिशेने हीच क्रिया करून हा पीळ हळूहळू सोडविला जातो या सर्व नृत्यात व त्यापासून तो सोडविण्यात पर्यंत साधारण पंचेचाळीस मिनिटे लागतात नृत्य करताना कलाकारांना खूप सतर्क रहावे लागते

कारण तो सोडवायचा असतो या क्रिया सुरू असताना सर्व प्रेक्षकांचे लक्ष द्या व भागावर केंद्रित झालेले असते त्यामुळे एक जरी कलाकार चुकला तरी बॉक्स सोडवता येत नाही हीच किमया या गोफ नृत्याची आहे जाकडी लेझीम धनगरी वोवी असे अनेक प्रकार या नृत्यात येतात अलीकडे त्यासाठी फक्त ८ ते १६ पर्यंत कापडी पट्ट्याचे वापरतात पूर्वी त्याची संख्या खूप होती.

मंगळागौर -

जय देवी मंगळागौर,
ओवाळीन सोनिया ताटी
रत्नाचे दिवे माणिकांच्या वाती
हिरे या ज्योती......
जय देवी मंगळागौर...

महाराष्ट्रामध्ये विविध सण आणि परंपरा आहेत श्रावण आणि भाद्रपद म्हणजे सणांची आणि व्रत-वैकल्याची रेलचेल चातुर्मासाचा मध्ये अनेक महत्त्वाचे सण आणि व्रतवैकल्ये असतात या व्रतवैकल्यं पैकी मंगळागौर हे महिलांचे आवडते व्रत . ज्याकाळी महिलांनी नाटक सिनेमात काम करणे दूरच पण फक्त उंबरठा ओलांडून बाहेर जाऊन पाहणेही शक्य नव्हते आणि सबलीकरण स्वावलंबन सर्वांगीण विकास हे शब्दही जेव्हा तिच्या शब्दकोशात नव्हते त्या आधीच्या काळापासून मंगळागौरीचे व्रत नववधूसाठी केले जायचे मंगळागौरीची गाणी आणि खेळ ही विशेषतः कोकणातील ब्राह्मण कुळातील कित्येक पिढ्यांनी जपलेली लोकपरंपरा आहे श्रावण महिना आणि स्त्रियांचे भावविश्व यांचे अतूट असे नाते आहे मंगळागौर हा फक्त धार्मिक स्थळ नाही तर त्याला सांस्कृतिक आणि सामाजिक अर्थ आहेत मंगळागौर सुजणे धार्मिक व्रतवैकल्यांचा भाग आहे पण मंगळागौर जागा घेणे ही सांस्कृतिक परंपरा आहे मंगळागौरीची पूजा पाच वर्षे करतात म्हणजे चार वर्षे पूजा करून पाचव्या वर्षी या व्रताची सांगता करायची असते त्याला उद्यापन म्हणतात हे व्रत आईने मुलीला सौभाग्य व्रत म्हणून दिलेले असते म्हणून पहिली मंगळागौर आईकडे असते चैत्र वैशाखात अंगाला लागलेली हळद पडल्यानंतर आपल्या नातेसंबंध गावातील स्त्रिया मुलींनी एकत्र जमून साजरा करायचा मंगळागौर या वर्षातील पहिला आनंदोत्सव नवपरिणीत येणे हक्काने माहेरी जाण्याचे पहिले निमित्त म्हणजे मंगळागौर या व्रतात आई वडिलांचा मान करायचा असतो उभयतांनी आई-वडिलांना नमस्कार करुन त्यांचा आशीर्वाद घ्यायचा असतो ज्यायोगे पुढील आयुष्य सुखासमाधानात आनंदात जाईल. याप्रसंगी सर्व स्त्रिया मिळून फुगडी, पिंगा विविध प्रकारची गाणी नृत्य करतात.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील गावांत आपापल्या चालीरीती रूढी परंपरा यांचे जतन करण्याच्या दृष्टीने सर्वांचे प्रयत्न चालू असतात रात्रीची भाकरी खाऊन हळूहळू स्त्री-पुरुष गावातील चौकात जमतात आणि गीतांच्या वाद्यांच्या तालावर आपलं पारंपरिक नृत्य करतात ही करमणूकही असते आणि तालीम सुद्धा असते छोटी मुले ही यात सहभागी होतात त्यामुळे आपोआपच ही कला एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्द केली जाते होळी दिवाळी दसरा गणपती यासारखे सण स्थानिक देवदेवतांचे उत्सव लग्न पूजा यांसारखे सण समारंभ हे लोकनृत्य सादर करण्याचे प्रसंग असतात स्वतःचा आनंद धार्मिक भावना सामूहिक जबाबदारी समाजऋण यांचं सुंदर मिश्रण याप्रसंगीच्या लोकनृत्य यातून असतं अनेक रंगांनी रंगवलेली ही मराठमोळी भूमी सह्याद्रीच्या कडेकपारी तून सागराच्या गाजे तून रानावनातून वैराण माळ रानातून आलेल्या ढोल ताशा या वाद्यांच्या नादाने पुलंकित झाली आहे दिंडी कोळी नृत्य लावणी तमाशा धनगरी नृत्य शेतकरी नृत्य या लोकनृत्य यामुळे इथल्या लोकसंस्कृती तुला आनंद टिकून आहे सांस्कृतिक दृष्ट्या असलेली ही महाराष्ट्राचे

संपन्नता लोकनृत्य यातून जपली जात आहे ही विशेष अभिमानाची गोष्ट आहे म्हणून या लोकनृत्य यांना व त्या कलाकारांना मानाचा मुजरा.

महाराष्ट्र भूमी वेरूळ अजिंठ्याच्या चित्र शिल्पांनी नटलेली बोलले सह्याद्री आणि सातपुडा पर्वत राजाजींनी भेटलेली भूमी प्रचंड सागर किनारा लाभलेले बोने प्रवरा गोदा भीमा इंद्रायणी वरदे पासून कृष्णा-पंचगंगा नद्यांनी कोणीच झालेली भूमी महान संतांची परमेश्वर योद्धांची भूमी वैभवशाली इतिहासाची नाती जपणारी भूमी पारंपरिक लोक कलेचे अधिष्ठान असलेली भूमी पारंपरिक लोकनृत्याचा सांस्कृतिक पण लिहिलेली ही महाराष्ट्र मराठी भूमी ही महान महाराष्ट्र भूमी.

**तात्पर्य**

अशा रीतीने भारताच्या विविध लोकनृत्यामध्ये प्रादेशिक भेद असले, तरी नृत्याच्या उगमस्थानी असलेल्या धार्मिक आशियाचे अंतसूत्र सर्वत्रच थोड्याफार प्रमाणात टिकून राहिल्याचे दिसून येते. विविध ऋतुमानाशी संबंध असलेल्या पेरणी, कापणी इत्यादी उत्सवांची निगडित असलेल्या सामाजिक नृत्यांमध्ये ही धार्मिकतेचा अंश दिसून येतो. धार्मिक लोक नृत्यांमध्ये तर भाव अप्रकटनाचे विविध रूपे आढळून येतात. काही भक्तिभाव नृत्य हे विशिष्ट देवतांचे उपासक असेच असतात. काही नृत्यात देवदेवतांना श्रेष्ठ मानवी रूपांमध्ये कल्पून दुष्ट शक्तींपासून त्यांच्यापासून मुक्ती लाभावी म्हणून त्यांची प्रार्थना केली जाते. अनेक देवदेवतांच्या स्थानासाठी पुराणातील धर्मग्रंथांतील कथा कल्पनांवर आधारलेली नृत्ये केली जातात. राधा-कृष्णाच्या चिरंतन प्रेमाची कथा अगणित नृत्य यांना स्फूर्ती देत आली आहे. कमी-अधिक प्रमाणात सर्वच लोकं नृत्यांमध्ये सामावतात. त्यामुळेच लोकनृत्ये हा राष्ट्रीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा ठरतो.

**संदर्भ**

१) राणे, सदानंद (२०१२) लोकगंगा : महाराष्ट्रातील लोककला आणि लोकनृत्ये. ठाणे : डिंपल प्रकाशन. प्रु. ३१४.

२) प्रसाद मासिक (२०१९)

**– संग्राहक**
**मनीषा चव्हाण**
मारथोमा विद्यापीठ,
शालेय ग्रंथपाल,
भ्रमणध्वनी- ९१७२४४८८७८
Email : manisha.chavan801gmail.com

---

(पृष्ठ क्र. १५ वरून – **स्वातंत्र्यवीर सावरकरांची कविता**)

विशेष म्हणजे १९३८ साली मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असताना सावरकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात भाषाशुद्धी, लिपिशुद्धी ह्यांचे महत्व सांगितले. साहित्याचे वस्तुनिष्ठ व रसनिष्ठ असे दोन भाग कल्पून त्याचे विवरण करत भाषणाच्या अखेरीस लेखण्या मोडा आणि बंदुका हातात घ्या' असा परखड विचार मांडला. देशसेवेचे वृत्त हे सतीचे वाण म्हणून स्वीकारलेला हा कवी 'तुजसाठी मरण ते  जनन, तुजवीण जनन ते मरण' असा उद्घोष करतो. आजच्या जगात देखील साहित्यिक व कवींच्या समोर असलेल्या आव्हानांना मोठी दिशा देणारी स्वातंत्र्यवीरांची लेखणी व काव्यसंपदा आपल्याला दीपस्तंभासारखी भारताच्या  उर्जस्वल भविष्याची साक्ष देत राहते.

**– डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी – ९४२२४९५०९४

●●●

---

## प्रिय मित्रास,

प्रिय मित्रास,

कसा आहेस तू...तुझ्या वयाची पन्नाशी गाठलीस कळलं देखिल नाही रे.... तुला असं पत्र लिहाव लागेल याची कल्पनाच कधी केली नाही किंवा असा प्रसंग येईल असं वाटलंच नाही म्हणता म्हणता तू पण पन्नाशीत शिरलास.

तुझ्या ५० व्या वाढदिवसानिमित्त मला तुला काहीतरी सांगायचं आहे. तुझं आणि माझं मैत्रीचं नातं हे सन २००२ पासून आजतागायत चालू आहे असेच अनेक वर्षे चालू राहील. तू माझा फक्त मित्र नसून एक देवदूतच आहेस कारण जो मी आज आहे व मला नाव मिळालं आहे हे तुझ्यामुळेच.

तू मला आपलंसं केलं व बघता बघता माझी प्रगती होत गेली. तू मला काय नाही दिलस... मला माझं अस्तित्व दिलं, ऋतबा दिलास, माझी स्वतंत्र ओळख दिलीस, मित्रपरिवार दिलास, चांगले गुरुजन दिलेस, शिक्षण दिलंस आणि नोकरी...त्याच बरोबर छोकरी पण म्हणजेच माझी अर्धांगिनी... अजून काय मागावं.

मैत्रीची व्याख्या ही कोणी तुझ्या कडून शिकावी, निस्वार्थ प्रेम हे तूच शिकवले. तुला रोज पाहताना खूप गर्व वाटतो. माझ्यासारखे अनेक असंख्य तुझे मित्र असतील अथवा मैत्रिणीही....

तू मला एक विद्यार्थी म्हणून पाहिलं, एक चांगला मित्र म्हणून पाहिलंस, शिक्षकेतर कर्मचारी म्हणून पाहिलंस व शिक्षक म्हणूनही पाहतोय... ह्या सगळ्या सांगण्याच रूपांतर की तुझी सुरक्षा करण्यासाठी महाविद्यालय परिसरात सुरक्षा प्रमुखाची भूमिका मी बजावत आहे.

गेल्या अठरा वर्षात मी तुला पाहत आलोय. तुझे बदलत जाणारे रूप खूप अदभूत आहे. तुझे जुने मित्र जेव्हा मला भेटतात आणि सांगतात अरे आमचं महाविद्यालय असं होतं, कँन्टीन इकडे पुढे होत, स्टेप्स असे न्हवते, प्रवेशद्वार एकच होते, युवा महोत्सव नवरंग ची धमाल, वैगरे वैगरे आणि हो हीच भावना आजच्या ही मुलांच्या मनामध्ये आणि पुढेही राहील कारण तू तसाच प्रेमळ आहे.

तुझ्याबद्दलच्या प्रत्येकाच्या आठवणी ह्या खूप वेगळ्या असतील आणि असणारच. पण मी जरा अपवाद असणार कारण माझ्या दिवसातले दहा तास मी तुझ्याच सहवासात असतो. कधी माझ मन बेचैन झालं असेल तर मी तुझ्या कुशीत उभारलेल्या कारंज्याचे उंच उडणारे फवारे पाहत असतो व नकळतच माझं मन स्थिर होतं.

महाविद्यालयात शिकत असताना माझे अनुभव खूप वेगळे आहेत तसेच याच महाविद्यालयात सेवा देत असताना अनुभव वेगळेच आहेत. खरंच खूप विलक्षण गोष्ट आहे, की ज्या महाविद्यालयात तुम्ही शिकलात, मोठे झालात, पदवी प्राप्त केली त्याच महाविद्यालयात तुम्ही तुमची सेवा ही देत आहात म्हणजे एक प्रकारचे ऋण परतफेड करतोय असं वाटते आणि ही भावना अशीच चालू राहणार फक्त आणि फक्त तुझ्याच साठी तू असाच मोठा हो, तुझी उत्तरोत्तर प्रगती व नावाची व्याप्ती बहरू दे हीच ईश्र्वरचरणी प्रार्थना!

तुझा मित्र,

स्वप्निल

**– स्वप्नील नंदकुमार मयेकर**
सुरक्षाकक्ष समन्वयक
विप्रमं महाविद्यालय परिसर, ठाणे
भ्रमणध्वनी – ९९२००८५८३७

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### १ मे

महाविद्यालयाच्या वतीने 'डिजिटल मार्केटिंग' या विषयावर एक महत्त्वपूर्ण वेबिनार आयोजित करण्यात आला होता. आय आय डी ई या संस्थेच्या केतन शाह यांचे मार्गदर्शन मिळाले. या साठी ४४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या वेबिनारचे संयोजन डॉ. शिरीष पाटील यांनी केले होते.

### ७ मे

महाविद्यालयाच्या बी बी आय व बी एफ एम "Counter the Pandemic through Financial Planning" या विषयावर जयशंकर गुप्ता यांचा वेबिनार आयोजित करण्यात आला होता.

### ९ मे

महाविद्यालयाच्या बी एम एम विभागातर्फे "Creative,Technical and Career-Spects of Film Making" या विषयावर ज्येष्ठ सिनेदिग्दर्शक यशवंत शेखावत यांचा वेबिनार आयोजित करण्यात आला होता. यासाठी १००० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती! बीएमएमचे समन्वयक डॉ महेश पाटील व प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.


### १४ मे

महाविद्यालयाच्या BAF विभागातर्फे "Managing Investment during Challenging Times - Present and Future" या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार आयोजित करण्यात आला होता. यासाठी वक्ते म्हणून बी एस इ ब्रोकर फोरमचे डॉ. आदित्य श्रीनिवास यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. नीलम शेख व प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

### १४ मे डिजिटल स्वरांजली

महाविद्यालयाच्या टॅलेंट अकॅडमी व रिसर्च कमिटीच्या वतीने 'डिजिटल स्वरांजली' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'वसंत ऋतू' या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुरेल गीत सादर केली. डॉ. मुग्धा बापट यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

### १४ मे मोनोग्राफ ई- अनावरण




रिसर्च कमिटीच्या वतीने "Higher Education in India: Prospect and Retrospect" या विषयावरील मोनोग्राफचे ई-अनावरण विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते झाले. हे पुस्तक हिमालय पब्लिकेशनने छापले असून प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, डॉ. प्रशांत धर्माधिकारी व डॉ. जयश्री सिंग यांनी संपादित केले आहे.

### १५ मे

महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभाग व Business Law

विचार न करता वाचन म्हणजे न पचवता खात सुटणं.

विभागातर्फे 'युद्ध आमुचे सुरू' "Women COVID 19 Warriors : Experiences from Ground Zero" या विषयावर वेबिनार आयोजित करण्यात आला होता.

डॉ. मीनाक्षी पुराणिक, श्रीमती नीता पडवी, डॉ. सुवर्णा कट्टी, डॉ. प्रियंका गोरड या करोना योध्यांनी आपले अनुभव व्यक्त केले. उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. प्रज्ञा राजेबहादूर, तसेच प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

### २३ मे

विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, ठाणे, बीएमएम / बीएएमएमसी विभाग कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील 'विद्यार्थी आणि शिक्षक' यांच्यासाठी महाराष्ट्र राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन ई-स्पर्धा आयोजित करण्यात आली. खालील विषयावर ही स्पर्धा घेण्यात आली.

**काव्यलेखन**

विषयः - 'लॉकडाउनमधील जीवन'

भाषा: - इंग्रजी, हिंदी किंवा मराठी

स्वरूप: - केवळ PDF file किंवा word file. स्पर्धकांची स्व-निर्मित कविता असावी.

**कथालेखन**

विषयः - 'लॉकडाउनमधील जीवन'

भाषा: - इंग्रजी, हिंदी किंवा मराठी

स्वरूप: - केवळ PDF file किंवा word file. स्पर्धकांची स्व-निर्मित कथा असावी.

**एक मिनिट फिल्म**

विषय : 'लॉकडाउनमधील जीवन'

स्पर्धकांची स्व-निर्मित फिल्म असावी.

**पुरस्कार**

प्रथम पुरस्कार - विजेता - गुणवत्ता ई-प्रमाणपत्र

द्वितीय पुरस्कार - उपविजेता - गुणवत्ता ई-प्रमाणपत्र

सर्व सहभागी स्पर्धकांना ई-प्रमाणपत्र देण्यात आले.

बीएमएमचे समन्वयक डॉ. महेश पाटील व प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

### २४ ते ३० मे

महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभाग व समुपदेशन केंद्राच्या वतीने "7-Days of Mindfulness" या कोर्सचे आयोजन करण्यात आले. संयोजन प्रा. वेदवती परांजपे यांनी केले.

### २० मे

महाविद्यालयाच्या वतीने "Top Paying Skills of 2020" याविषयी अंतिम वर्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असा वेबिनार आयोजित करण्यात आला. १३२ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. प्लेसमेंट सेलचे प्रा. नीतिन पागी व डॉ. शिरीष पाटील यांनी संयोजन केले

### २५ मे 'डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला'

वरील व्याख्यानमालेचे २३ वे पुष्प डॉ. नानाजी शेवाळे (ज्येष्ठ ग्रंथपाल) यांनी ,'भारतातील सामाजिक व आर्थिक घडामोडी : GIPE (Gokhale Institute of Politics and Economics) आणि त्यांच्या लायब्ररीचे योगदान' या विषयावर मांडले. प्रास्ताविक व स्वागत - प्रा. नारायण बारसे यांनी केले. प्राचार्या डॉ. (सौ.) सुचित्रा नाईक यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. संयोजन डॉ. महेश पाटील यांनी केले.

---

दृष्टीकोन हा मनाचा आरसा आहे, तो नेहमी विचारच परावर्तीत करतो.

### ३० मे

महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभाग व बोधमार्ग फाऊंडेशनच्या वतीने "Experience Nada Yoga Guided Sound Therapy" या विषयावर ३० मे रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रा. वेदवती परांजपे, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**लॉकडाउन ॲक्टीविटीज् : एप्रिल व मे २०२०**

### १) इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम

शिक्षकांनी जर्नल पेपर्स मॅगझिनमध्ये प्रकाशित केले. 'कोविड-१९' या विषयावर लेख लिहून व्ही. पी. एम. च्या वेबसाईटवर प्रकाशित केले. २० एप्रिल ते १७ मे २०२०च्या दरम्यान "Tools of online teaching learning process" या विषयावर गव्हर्रमेन्ट पॉलिटेक्निक जळगाव व MSBTE यांच्या संयुक्त कार्यप्रणालीने ४ आठवड्यांचा ऑनलाईन FDP चा लाभ सौ. आर. यू. पाटील, सौ. अस्मिता कऱ्हाळकर व सौ. कविता अहिरे यांनी घेतला.

सर्व शिक्षक वर्गाने ५ दिवसाचा FDP (सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज आयोजित) ३० मे ते ३ जून २०२० या कालावधीत झालेल्या कार्यक्रमाचा लाभ घेतला. शिक्षकेतर वर्गाने ५ दिवसीय FDP(सॉफ्ट स्किल ट्रेनिंग) BRIMS व्ही. पी. एम. आयोजित कार्यक्रमाचा १७ एप्रिल ते २२ एप्रिल २०२० रोजी झालेल्या कार्यक्रमात सौ. नांगरे यांचा सहभाग होता. विद्यार्थी वर्गाने १७ ई-सेशन्स विविध विषयांवर Innovation Enterpreneurship अंतर्गत MHRD'S IIC आयोजित केलेल्या कार्यक्रमांचा लाभ घेतला. बांदोडकर कॉलेज, ठाणे यांनी आयोजित केलेल्या पोस्टर प्रेझेन्टेशन स्पर्धेमध्ये विद्यार्थी वर्ग मोठ्या उत्साहात सहभागी झाला होता.

### २) इन्फॉर्मेशन्स टेक्नोलॉजी विभाग

डॉ. उषा राघवन (विभाग प्रमुख) यांनी २ FDP, २ वर्कशॉप, ७ वेबिनार, ५ पेपर प्रकाशन, ४ अवेरनेस कार्यक्रम, १७ IIC सेशन्स, ६ लिडरशिप टॉक, २ ऑनलाईन क्विझ लॉकडाऊन कालावधीत पूर्ण केल्या. सौ. ऋतुजा तेंडुलकर यांनी २ FDP, ४ वर्कशॉप, ३ वेबिनार, २ अवेरनेस कार्यक्रम, सौ. राधिका कामत, सौ. अर्चना कालिया, सौ. स्वाती जोशी, सौ. गौरी बोबडे यांनी FDP, वर्कशॉप, वेबिनार व ऑनलाईन क्विझमध्ये सहभाग घेतला. सौ. वर्षा पागनीस यांनी २ FDP, ४ वर्कशॉपस्, १ वेबिनार, १ अवेरनेस कार्यक्रम व STTP (५ दिवसाच्या) कार्यक्रमात सहभाग घेतला. क्रांती बस्ताव व सौ. नीलम इंदुलकर यांनी १ FDP व १ अवेरनेस कार्यक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी IIC १७ सेशन्समध्ये सहभाग घेतला.

### ३) इन्डस्ट्रीयल इलेक्ट्रोनिक्स विभाग

डॉ. कीर्ती आगाशे (विभागप्रमुख) यांनी १ FDP कार्यक्रमात व STTP कार्यक्रमात सहभाग घेतला. "Emerging trends in electronics" तृतीय वर्षासाठी Mock Test चे आयोजन केले.

सौ. शांती लगुडुवा यांनी ३ FDP कार्यक्रम पूर्ण केले. Online  ऑनलाईन क्विझचे आयोजन करण्यात मदत केली. तीन दिवसाचा वर्कशॉप, १७ ई-सेशन्स (IIC-MIC-AICTE Team), २ वेबिनार मध्ये सहभाग घेतला. सौ. ज्योती साजी यांनी १ FDP, १७ ई-सेशन्समध्ये सहभाग घेतला. सुनिल नागरे यांनी १ आठवड्याचा FDP, Mock Test, क्विझ तयार करण्यास मदत केली. १७ ई-सेशन्समध्ये सहभाग घेतला.

### ४) इन्स्ट्रुमेन्टेशन्स विभाग

सौ. वैशाली जोशी (विभाग प्रमुख), सौ. स्मिता खंडागळे यांनी ४ FDP कार्यक्रमात, ४ वेबिनारमध्ये,

वर्कशॉपस्मध्ये सहभाग घेतला. टेक टॉक २०२० वेबिनार सिरीजमध्ये सहभाग घेतला.

**५) कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग**

सौ. सुहासिनी शुक्ल (विभाग प्रमुख), सौ. गौतमी पुजारे यांनी ४ FDP, ७ वेबिनार, वर्कशॉप्स, अवेरनेस कार्यक्रमात सहभाग घेतला.

**६) प्रथम वर्ष विभाग (Humanities And Applied Science)**

सौ. सुजाता गुप्ते (इन्चार्ज प्रथम वर्ष) यांनी वेबिनार, टॉक सिरीज, वर्कशॉप्समध्ये सहभाग घेतला. डॉ. गीताली इंगवले (इन्चार्ज ग्रंथालय) यांनी ४ FDP, ७ वेबिनार, ३ अवेरनेस कार्यक्रम, १२ IIC टॉक सेशन्स, रसायनशास्त्र निगडित ४ वेबिनार, Online Quiz स्पर्धेमध्ये सहभाग घेतला.

श्री. शिंगाडे, सौ. वंदना नाईक, सौ. मृणाल ताटके, सौ. मनीषा दळवी, कु. श्रद्धा जाधव यांनी १७ एप्रिल ते २२ एप्रिलच्या दरम्यान ५ दिवसीय FDP (सॉफ्ट स्कील ट्रेनिंग) BRIMS व्ही. पी. एम. आयोजित कार्यक्रमाचा लाभ घेतला.

एप्रिल व मे महिन्यात विद्यार्थ्यांनी अनेक ऑनलाईन स्पर्धेत सहभाग घेतला. अनेक वेबिनार, क्विझ स्पर्धेत सहभागी होऊन सर्टिफिकेट्स पात्र ठरले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**एप्रिल – २०२० मधील कार्यक्रम / वार्ता**


१ एप्रिल : डॉ. नीतिन जोशी यांनी प्रेरणा(Motivation) विषयावर वर ऑनलाईन व्हिडिओ लेक्चर सीरिज तयार केली.



२ एप्रिल : SCOPUS अनुक्रमित नियतकालिके Environment, Development Sustainability आणि International Journal of Knowledge and Learning यासाठी डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांची समीक्षक (Reviewer) म्हणून निवड झाली.

४ एप्रिल : डॉ. स्मिता जपे आणि डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी "Crisis Management Strategies to mitigate the Global Covid-19 pandemic : The Indian Scenario" या विषयावरील केस स्टडी The South Asian Journal of Business Management and Management Cases या नियतकालिका मध्ये सादर केली.

१० एप्रिल : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि विद्यार्थी समिती सदस्यांनी ब्रीम्स कनेक्ट या मासिक कार्यक्रमाचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन केले.




११ एप्रिल : प्रा. महेश भानुशाली यांनी एसबीआय कॅपिटल या संस्थेकरिता १५ उमेदवारांच्या मुलाखतीसाठी यशस्वीरित्या समन्वय साधला आणि त्यामध्ये अंतिम वर्षाच्या वित्त शाखेच्या, लक्ष्मी गोधे, निखिल कदम, अक्षय बागवे, परेश घाडगे, पवन राजू या पाच विद्यार्थ्यांची निवड झाली.

१४ एप्रिल : डॉ. स्मिता जपे आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांची जर्नल ऑफ क्रिटिकल रिव्ह्यू या नियतकालिकासाठी समीक्षक (Reviewer) म्हणून निवड झाली.


१५ - ३० एप्रिल : ब्रीम्सच्या नियुक्ती विभागाचे सभासद प्रा. प्रवीण नारंग यांनी सिंटेल या कंपनीतील वित्त क्षेत्र पदासाठीच्या व्हर्च्युअल / टेलिफोनिक मुलाखत प्रक्रियेचे यशस्वीपणे समन्वयन केले. २२ उमेदवारांनी मुलाखती यशस्वीरित्या दिल्या आहेत. २०२० च्या मे महिन्यात निकाल जाहीर केला जाईल.

१३ एप्रिल : प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी 'डिझाईन थिंकिंग' या विषयावर एक व्हिडिओ तयार केला.

१५ - ३० एप्रिल : ब्रीम्सच्या नियुक्ती विभागातर्फे आभासी / व्हर्च्युअल इंटर्नशिप प्रोग्राम्ससाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कामे मिळाली आहेत. त्यापैकी ५० उमेदवारांना घरून करता येतील अशा असाइनमेंटचे काम मिळाले आहे. श्रीमती श्वेता नायर यांनी ही प्रक्रिया यशस्वीपणे हाताळली.

१७ - २२ एप्रिल : डॉ. अरलोफ आणि प्रा. कंचन अक्षय यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या कर्मचारी सदस्यांसाठी ५ दिवसांचा 'ऑनलाईन सॉफ्ट स्किल' कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला. प्रा संदीप मोघे यांनी कार्यक्रमासाठी आवश्यक ते सर्व तांत्रिक सहकार्य केले.




२० एप्रिल : प्रा. महेश भानुशाली यांनी क्रीसालीस (Chrysalis) येथे वित्तीय संशोधक पदासाठी एमएमएस व पीजीडीएमच्या वित्त शाखेच्या अंतिम वर्षाच्या उमेदवारांच्या दूरध्वनी द्वारे / आभासी (टेलिफोनिक / व्हर्च्युअल) मुलाखतीसाठी यशस्वीरित्या समन्वय साधला. कु. यशश्री जुवेकर यांना प्रत्यक्ष मुलाखत फेरीसाठी निवडले गेले आहे. अंतिम मुलाखत जून २०२० च्या पहिल्या आठवड्यात होईल.

तसेच प्रा. महेश भानुशाली यांनी मार्केट रिसर्चवरील वर्च्युअल इंटर्नशिप प्रकल्पासाठी Ehnote Softlabs येथे देखील दूरध्वनीद्वारे मुलाखतीच्या प्रक्रियेसाठी यशस्वीरित्या समन्वय साधला आणि प्रथम वर्षाच्या ४ विद्यार्थ्यांना यशस्वीरित्या प्रकल्पाचे काम मिळाले.

२३ एप्रिल ते ३ मे : डॉ. स्मिता जपे आणि डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या आयक्यूए समिती तर्फे दैनिक वृत्तपत्रावर आधारित कोविड -१९ जागरूकता प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेला पहिल्या वर्षाच्या सर्व एमएमएस आणि पीजीडीएम विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दर्शविला.

२४ एप्रिल : प्रा. संदीप मोघे यांनी प्राध्यापकांसाठी व्हिडिओ मेकिंग प्रशिक्षण सत्र आयोजित केले. पीजीडीएम प्रथम वर्षाचे आमचे विद्यार्थी श्री. अजय आणि श्री. रुषभ यांनी देखिल व्हिडिओ बनविण्याचा आपल्या अनुभवाचे कथन करून या सत्रामध्ये सहकार्य केले.

२७ एप्रिल : डॉ. नीतिन जोशी, डॉ. अर्लोफ, डॉ. पल्लवी चांदवसकर, प्रा. विभूती सावे, प्रा. कृणाल पुंजानी आणि प्रा.संदीप मोघे, प्रादेशिक सहसंचालक / सहसंचालनालय उच्च शिक्षण, कोकण प्रदेश द्वारा आयोजित ई-कंटेंट डेव्हलपमेंट विषयक एक दिवसीय कार्यशाळा व वेबिनारला उपस्थित राहिले.

२७ एप्रिल ते १ मे : डॉ. स्मिता जपे, प्रा. दिप्ती

पेरिवाल, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि प्रा. सिद्धेश सोमण, वित्त शाखेतील प्रगत संशोधन पद्धती (ॲडव्हान्स रिसर्च मेथडस् ) या विषयाच्या ५ दिवसांच्या प्राध्यापक विकास कार्यक्रमास उपस्थित राहिले.

२७ एप्रिल : डॉ. व्ही. एन. ब्रीम्स च्या आय. आय. समिती तर्फे प्रा. कृणाल के पुंजानी, डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. महेश भानुशाली, प्रा. विभूती सावे आणि प्रा. संदीप मोघे यांनी एमएमएस आणि पीजीडीएमचे विद्यार्थी आणि त्यांचे संबंधित शिक्षक यांच्यासाठी 'इनोबिझ' या नवनिर्माण स्पर्धेची रचना आणि सुरुवात केली.

२८ एप्रिल : प्रा. महेश भानुशाली यांनी IIFL या संस्थेमध्ये दूरध्वनी द्वारे मुलाखतीच्या प्रक्रियेसाठी यशस्वीरित्या समन्वयन केले आणि प्रथम वर्षाच्या ७ विद्यार्थ्यांना आभासी / व्हर्च्युअल इंटर्नशिप प्रकल्पांचे काम मिळाले.

३० एप्रिल: प्रा. महेश भानुशाली यांनी ई -४ डेव्हलपमेंट आणि कोचिंग, मुंबई येथे दूरध्वनी द्वारे मुलाखतीच्या प्रक्रियेसाठी यशस्वीरित्या समन्वयन केले आणि प्रथम वर्ष मानव संसाधन शाखेची विद्यार्थिनी श्रमिका घागरे हिला यशस्वीरित्या इंटर्नशिपसाठी स्थान मिळाले.

**टाळेबंदी कालावधीत प्राध्यापकांनी तयार केलेले विविध व्हिडिओ, लेख, कविता आणि रेखाटनं**

| Faculty & Staff Name | Topic |
|---|---|
| Dr. Nitin Joshi | Series of Videos on "Psychology of Motivation" |
| Prof. Kanchan Akshay | Change with Agility- Need for Business |
| Dr. Meenakshi Malhotra | Business Innovation during COVID 19 Crisis |
| Prof. Krunal K. Punjani | "Rising from The Ashes with the Growth Mindset" |
| Prof. Mahesh Bhanushali | Sketch |
| Dr. Pallavi Chandwaskar | Poem on "Exploring Life" |

**टाळेबंदी कालावधी दरम्यान खालील वेबिनार किंवा अभ्यासक्रमांना प्राध्यापक उपस्थित राहिले.**

| Faculty | Topic |
|---|---|
| Dr. Nitin Joshi | 1. Certificate program on Motivation.<br>2. Three IIC webinars |
| Dr. Smita Jape | 1. Fiscal 2020: Credit quality credit rating by CRISIL.<br>2. Leadership<br>3. Writing Cases Remotely.<br>4. Research<br>5. ISDM Social Impact and Management : An Odd Couple? Prof AK Shiva Kumar |

| | |
|---|---|
| Dr. Smita Jape<br>(Online Course) | 1. Meditation for self transformation<br>2. Microsoft Excel - Excel Power Query, Power Pivot & DAX.<br>3. Advanced excel |
| Prof. Dipti Periwal | 1. Financial Analysis (Online Course)<br>2. Writing Cases Remotely : Practical Tips For Case Writers and Researchers Confirmation |
| Dr. Pallavi Chandwaskar | 1. Online workshop on Improving Research Planning & Writing Skills at Technical Institutes<br>2. Attended CRISIL Webinar on Impact of global pandemic on Credit Quality<br>3. Completed Beginners Training for Software Atlas.Ti 8 for Windows through Webinar<br>4. "Intervention of Technology in Higher Education amid Corona Crisis- Are we Future Ready!!<br>5. "Enhance Research visibility to improve Ranking webinar"<br>6. Leadership Talk of MHRD Innovation Cell with Prof. K.K. Agarwal (Chairman, NBA)<br>7. "From Pandemic Pedagogy to Planned Online Teaching and Learning"<br>8. " Training Competencies for Teaching Faculty" by AIMS<br>9. Workshop on Improving Research Planning and Writing Skills at Technical Institutes<br>10. National Innovation and Start-up policy for Students and Faculty<br>11. Integrating SCOPUS API into your Everyday Workflow |
| Dr. Pallavi Chandwaskar<br>(Online Courses) | 1. FDP registration for NITT course on SWAYAM portal<br>2. Online course on Design Thinking initiated |
| Prof. Kanchan Akshay<br>(Online Course) | 1. Change Management |
| Prof. Kanchan Akshay<br>(Webinar) | 1. National Innovation and Startup policy for Students by MHRD<br>2. How to sell courses online<br>3. Customer Change in Normal New<br>4. How can universities contribute in Upskilling students<br>5. Future Trends and Careers in Digital Marketing<br>6. MHRD-IIC |
| Prof Sandeep Moghe | 1. AICTE's Webinar on Improving Research Planning |
| Prof. Vibhuti Save | 1. Online Workshop on Intellectual Property Rights |

| | |
|---|---|
| | 2. Elets Webinar -Intervention of Technology in higher education amid Corona crisis<br>3. Attended webinar on "From Jugaad" to "Systematic Adoption" of Technology "Be better prepared for the future Confirmation"<br>4. Leadership Talk with Prof. K. K. Aggarwal<br>5. Training Competencies for Teaching Faculty by Prof. M. Chandrasekhar |
| Prof. Krunal K. Punjani | 1. "Future of work, Jobs, Career post COVID19" by the Chairman & MD of HUL<br>2. Webinars organized by MHRD IIC<br>3. AICTE & MHRD's Leadership Talk Series<br>4. "Covid19 – A Learning Opportunity for Higher Education" conducted by ASSOCHAM<br>5. "Developing effective learning outside classroom during COVID-19"<br>6. Economic Times - Brand Equity on "Staying Relevant in Difficult Times<br>7. AIMS (Association of Indian Mgt. Schools) on - "Training Competencies for Teaching Faculty<br>8. "Improving Research Planning at Technical Institutes & Quality Research Writing" |
| Dr. Arloph Johnvieira | 1. Business & HR Challenges<br>2. Training Competencies for Teaching Faculty<br>3. From Pandemic Pedagogy to Planned Online Learning Teaching<br>4. Engaging Discussions around digital leadership and innovation in current times<br>5. Developing Skill Oriented Learning for Better Future<br>6. Journal Indexing Methods<br>7. MHRD's e session on Innovation<br>8. Disruptions Proofing Supply Chains<br>9. Mindfulness & Resilience for Managing Stress and Uncertainty<br>10. Hangout with Emerging Innovators and Entrepreneurs<br>11. Can COVID 19 Spur Education 4.0 |
| Dr. Meenakshi Malhotra | 1. Webinar for Training competency for teaching<br>2. MHRD NBA<br>3. "Enhance Research visibility to improve Ranking webinar"<br>4. IIC -MHRD (Leadership Talk)5.Shackleton's Endurance Expedition |

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

न्यायसंस्थेमध्ये काम करत असतानाच, त्यांना बंगाली आणि हिंदूस्थानी भाषा शिकायला लागल्या. कामचलाऊ अरेबिक यांना येत असले, तरी ते संस्कृत नक्कीच शिकलेले नव्हते. ईस्ट इंडिया कंपनीच्या कलकत्त्यामधील फोर्ट विल्यम (Fort William) येथील कार्यालयामध्ये कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून त्यांची नियुक्ती झाली. रॉबर्ट क्लाईव्ह यांच्या निवृत्तीनंतर काही काळ १७६० मध्ये बंगालचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी काम पाहिले. कलकत्त्याच्या २४ परगणा जिल्ह्याचे जमीनदार म्हणून १७५१ मध्ये त्यांची नेमणूक झाली होती.

त्यावेळी कलकत्त्याची एक महत्त्वाची दुर्दैवी घटना म्हणजे, फोर्ट विल्यममधील काळकोठडीमध्ये झालेले इंग्रजांचे मृत्युकांड (Black Hole). या काळकोठडीत जॉन हॉलवेल यांनाही ठेवले होते. पण ते जिवंत बाहेर पडले. या त्यांच्या अनुभवावर लिहिलेले त्यांचे पुस्तक –Genuine Narrative of the DeplorableDeaths of the English Gentlemen, and Others, who Were Suffocated in the Black-Hole. (London 1758) बरेच गाजले.

त्यांनी भारतीय संस्कृती, आचार–विचार आणि चालीरीतींच्या त्यांच्या निरीक्षणावर आधारित तीन खंडात्मक ग्रंथ त्यांनी लिहिले. १७६५ ते १७७१ पर्यंत ते प्रकाशित होत होते. या ग्रंथाचे शीर्षकही बरेच लांबलचक होते. Interesting Historical Events, Relative to the Provinces of Bengal, and the Empire of Indostan... as also the mythology and cosmogony, fasts and festivals of the Gentoo's, followers of the Shastah. and a dissertation on the metempsychosis, commonly, though erroneously, called the Pythagorean Doctrine.

जॉन हॉलवेल यांची ही निरीक्षणशक्ती आणि त्यांच्या नोंदी ठेवण्याची सवय यामुळे त्यांनी असेच आणखीन एक महत्त्वाचे पुस्तक लिहिले. बंगालमध्ये त्यावेळी देवीच्या साथी येत असत. त्यावेळी त्यांनी बंगाल मध्ये देवी होऊ नयेत म्हणून लसीकरणाचा एक प्रकार बघितला. त्यावरही त्यांनी एक पुस्तक लिहून ठेवलं. त्याचे शीर्षक होते – an account of the Manner of Inoculating for the Small Pox in the East Indies: With Some Observations on the Practice and Mode of Treating that Disease in Those Parts. (London 1767). अर्थात देवीच्या लसीचा शोध एडवर्ड जेन्नर (Edward Jenner) यांनी १७९६ साली लावला. १७६० मध्ये ते इंग्लंडला परत आले. पुढे त्यांच्याकडून फारसे महत्त्वाचे लिखाण झाले नाही. १७६७ साली लंडनच्या रॉयल सोसायटीने त्यांना सन्माननीय सभासदत्व बहाल केले होते. १७९८ मध्ये त्यांचे देहावसान झाले.

### अलेक्झांडर डॉव

अलेक्झांडर डॉव यांनीही भारताच्या इतिहासावर लिखाण करून ठेवले आहे. १७६० साली ईस्ट इंडिया कंपनीच्या सैनिकदलामध्ये त्यांची भरती झाली. पर्शियन भाषेवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते. १७६८च्या सुमाराला भारताच्या इतिहासावर History of Hindostan हे दोन खंडात्मक ग्रंथ त्यांनी लिहिले. फरीश्ता (Firishta) या इतिहासकाराच्या भारताच्या इतिहासाच्या ग्रंथांचे ते भाषांतर आहे, असे अभ्यासकांचे मत आहे. १७७२ साली त्यांनी तिसरा खंडही लिहून पुरा केला. तेही संस्कृत शिकले नव्हते. १७६९ साली त्यांच्या ग्रंथांचे फ्रेंचमध्येही भाषांतर झाले. १७७९ साली भारतामध्येच भागलपूरला त्यांचे देहावसान झाले.

### नॅथानियल हालहेड

नॅथानियल हालहेड हे तात्कालीन इंग्लंडमधल्या उच्चभ्रू कुटुंबातून आले होते. १७७१ मध्ये ते भारतात आले. वॉरन हेस्टींग यांचे ते चांगले मित्र होते. त्यांचे संस्कृत भाषेचं ज्ञानही जेमतेमच होतं. पण बंगाली

भाषेवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते असे दिसते. वॉरन हेस्टींग यांच्या आग्रहामुळे त्यांनी बंगाली भाषेचे पहिले व्याकरण लिहिले. बंगाली भाषेच्या व्याकरणाच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये बंगाली भाषा संस्कृतोद्भव असल्याचे मत त्यांनी नोंदवले आहे. एवढेच नाही तर ग्रीक, लॅटिन आणि संस्कृत भाषांमधील साधर्म्यही १७७९ साली, विल्यम जोन्स (William Jones) यांच्या आधी त्यांनी दाखवून दिले होते,

Every part of speech, and every distinction which is to be found in either Greek or in Latin, and that in some particulars it is more copious than either. I do not attempt to ascertain as a fact, that either Greek or Latin are derived from this language; but I give a few reasons wherein such a conjecture might be founded; and I am sure that it has a better claim to the honour of a parent than, Phoenician or Hebrew.

भारताचा राज्यकारभार भारतीय परंपरेनुसार चालवायचा या वॉरन हेस्टींग यांच्या आग्रहामुळे न्यायदानाकरिता अकरा पंडितांकडून 'विवादार्णवसेतू' ही न्यायिक संहिता त्यांनी लिहून घेतली. त्याचे पर्शिअनमध्ये भाषांतर झाले. आणि पर्शियनमधून हालहेड यांनी त्याचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले. त्याचे शीर्षक होते, A Code of Gentoo Laws or Ordinations of the Pundits. ईस्ट इंडिया कंपनीने १७७६ साली ते लंडनहून प्रकाशित केले. लगेच त्याची दुसरी आवृत्ती १७८१ मध्ये प्रकाशित झाली. १७७८ साली त्याच्या फ्रेंच आणि जर्मन आवृत्त्या प्रकाशित झाल्या.

१७८५ साली वॉरन हेस्टींग बरोबर ते लंडनला परत आले. १७९० ते १७९५ दरम्यान ते लंडनच्या पार्लमेंटचे सभासद झाले. टोपण नावाने त्यांनी इतरही बरेच लिखाण केले. हालहेड यांनी बरीच संस्कृत हस्तलिखितेही जमा केली होती. पुढे ब्रिटिश म्युझियमने तो सगळा संग्रह विकत घेतला. महाभारताचेही भाषांतर करायला त्यांनी घेतले होते. ते पूर्ण झाले नाही. त्याची प्रत बंगालच्या एशियाटीक सोसायटीच्या लायब्ररीमध्ये उपलब्ध आहे. अशा या हरहुन्नरी अभ्यासकाचे निधन १८३० ला लंडनमध्ये झाले.

संस्कृत किंवा भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाकरता या तिघांचेही लिखाण फार महत्त्वाचे आहे. त्यांच्या ग्रंथांची फ्रेंच आणि जर्मन भाषेमध्येही भाषांतरे झाली. युरोपमधील तत्कालीन अनेक संशोधनपर मासिकांमधून त्यांच्या लिखाणावर लेख लिहून आले. त्यांच्या हिंदू धर्मासंबंधीच्या निरीक्षणामध्ये अनेक त्रुटी किंवा चुका आहेत. पुढील संशोधकांनी त्या दाखवून दिल्या आहेत.

विल्यम जोन्सच्या आधीचा हा सगळा इतिहास आहे.

हिंदू धर्माबद्दल कुतूहल आणि अधिक माहिती मिळविण्याची ईर्षा त्यांच्या लिखाणामुळेच युरोपमध्ये निर्माण झाली. वॉल्टेअर (Voltaire) यांनी हिंदू धर्माच्या अभ्यासामध्ये खूपच रस घेतला होता. त्यांनीही हालवेल आणि डॉव यांचे लिखाण वाचले होते. वॉल्टेअर यांच्या लिखाणावर त्यांचा परिणाम दिसून येतो, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

हिंदूधर्माच्या अभ्यासाकरता या तिघांनीही लिहिलेल्या ग्रंथांचे वाचन करणे म्हणूनच आवश्यकच नाही तर अपरिहार्यही आहे.

**– डॉ. विजय बेडेकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.